भाग चौथा

१९६८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू प्रवास
सं. क्र. ३८८






# आपले देव आपली देवळे



REFBK-0015833






शं. रा. देवळे

॥ श्री ॥

आपले देव आणि आपली दैवते या मालेचा चौथा आणि पाचवा भाग आज प्रकाशित होत आहे. हे पाच भाग व बारा ज्योतिर्लिंगे हे सहावे पुस्तक. यातून भारतातील सुमारे साठ प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांचा परिचय करून दिला आहे. पवित्र स्थळांना भेटी देण्याची व ती श्रद्धेने, जिज्ञासेने आणि थोड्याफार चिकित्सक बुद्धीने पाहण्याची सवय मला माझे आजोबा कै. विष्णु बाळकृष्ण देवळे आणि कै. विठ्ठल बाळकृष्ण देवळे यांच्या सहवासात लागली. यातील बऱ्याच ठिकाणचा प्रवास त्यांच्यामुळे घडला. भारतप्रवासी भाईसाहेब काळे यांच्या बरोबर काही ठिकाणे पाहिली. माझे स्नेही श्री. रं. म. जोशी निर्मळ व श्री. ना. स. ( नाना ) करंदीकर यांचा सहवास प्रवासात काही ठिकाणी घडला. पुस्तके तयार करताना माझे ज्येष्ठ स्नेही श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे यांचे मार्गदर्शन मिळाले. ही पुस्तके ' लेखन वाचन भांडार 'चे श्री. दादासाहेब ठोकळ यांनी प्रकाशनास स्वीकारली. चित्रकार श्री. ग. वि. देशपांडे आणि श्री. म. वि. सोवनी यांनी सुबक रेखाचित्रे करून ती सजविली. अनेक श्रेष्ठ लेखकांच्या हिंदी, मराठी, इंग्रजी आणि गुजराती संदर्भ पुस्तकांचे साहाय्य मला झाले. या सर्वांच्या कृपेमुळेच माझ्या हातून हे काम झाले. या सर्वांचा मी ऋणी आहे. माझा प्रयत्न वाचकांना आवडेल अशी आशा करतो.

– शं. रा. देवळे



हिंदुस्थान
काही तीर्थक्षेत्रे
अमरनाथ
अमृतसर
पश्चिम
पाकिस्तान
केदारनाथ
हरिद्वार
दिल्ली
मथुरा
गोकुळ
वृन्दावन
अयोध्या
प्रयाग
काशी
गया
कामाख्या
पूर्व
पाकिस्तान
चित्रकूट
अबू
सिध्दपूर
उज्जयिनी
कलकत्ता
डाकोर
द्वारका
गिरनार
सोमनाथ
ओंकारमांधाता
अमरकंटक
भुवनेश्वर
कोणार्क
जगन्नाथपुरी
मुंबई
वेरूळ
परळीवैजनाथ
श्रीशैल
मल्लिकार्जुन
तिरुपती
गोकर्ण
महाबळेश्वर
श्रवण-
बेळगोळ
कांची
मद्रास
अरुणाचलम्
चिदंबरम्
मदुरा
रामेश्वर
कन्याकुमारी
लंका

स्थळप्रत
९२३५२
३८८

# १ : तिरुपतीचा व्यंकटेश

तिरुपती येथील व्यंकटेशाचे मंदिर हे वैष्णव पंथियांचे अतिशय आवडते देवस्थान आहे. इतकेच नव्हे तर, त्या ठिकाणी साऱ्या भारतातील नाना पंथांचे असंख्य भाविक नित्य येत असतात.

आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यात चंद्रगिरी तालुक्यात हे प्रसिद्ध क्षेत्रस्थान आहे. रेल्वेने आणि सडकेने या ठिकाणी जाण्याची उत्तम सोय आहे. पुणे ते रायचूर पाचशे एकवीस किलो मीटर आणि रायचूर ते रेनीगुंठा चारशे तीस किलो मीटर असा रेल्वेचा प्रवास करावा लागतो. रेनीगुंठा ते तिरुपती ( पूर्व ) हे अंतर रेल्वेने फक्त दहा किलो मीटर आहे. तिरुपती (पूर्व) हे रेल्वे स्टेशन रेनीगुंठा वेल्लीपुरम या मीटर गेज दक्षिण रेल्वे फाट्यावर आहे. या स्टेशनपासून सुमारे बावीस किलो मीटर अंतरावर मोटरीने तिरुमल्लै या टेकड्यांवर जाण्याची उत्तम सोय आहे.

या तिरुमलैच्या टेकड्यांवर तिरुपतीचा व्यंकटेश हे मुख्य देवस्थान आहे. या टेकड्यांवर जाण्यासाठी पूर्वी

सर्व यात्रेकरूंना अनेक पायऱ्या चढून टेकडीवर जावे लागत असे; पण आता सुमारे दहा वर्षांपूर्वी देवळापर्यंत घाटाचा रस्ता तयार केला आहे. त्यामुळे यात्रेकरूला थेट देवळापर्यंत या रस्त्याने मोटरीने येता येते.

या टेकडीची उंची समुद्रसपाटीपासून अट्ठावीसशे फूट आहे. तिरुमलै टेकडी ही पूर्व घाटाचाच एक फाटा असून, त्या फाट्याला व्यंकटाचल किंवा शेषाचल असे म्हणतात. पूर्व घाटाचा या बाजूचा भाग, त्याचे चढउतार व त्याची वळणे ही जणू काही शेषाच्या आकाराची आणि तिरुपतीच्या सात टेकड्या म्हणजे त्या शेषाच्या सात फणा आहेत. असे पाहणाराला वाटते. म्हणून या टेकडीला शेषाचल म्हणजे शेष नागाच्या आकाराचा डोंगर म्हणतात. ज्या ठिकाणी नृसिहमूर्तीची पूजा केली जाते, तो शेषाचा मध्य व श्रीशैल्य हे त्या शेषाचे शेपूट समजले जाते.

## पौराणिक महिमा :

या साती टेकड्या म्हणजे प्राचीन मेरू पर्वताचा भाग आहे. यासंबंधी पुराणातील पुढील कथा प्रसिद्ध आहे. एकदा सर्पांचा राजा आदिशेष व वाऱ्यांचा राजा वायू यांमध्ये झगडा सुरू झाला. तेव्हा वायुराजाने जोराने वाहायला सुरुवात केली आणि मेरू पर्वताच्या हजारो टेकड्यांची वाताहत करण्यास सुरुवात केली. परंतु आदिशेषाने हजारो फणे उभारून त्या टेकड्यांचे संरक्षण केले. वायुराजाचा पराभव झाला. तेव्हा त्याने वाहण्याचे बंद केले. आता

स्थळप्रत
अनु. ८७३५२ दि.
क्रमांक ३८८


सर्व सुरक्षित झाले, असे पाहून शेषाने आपला फणा वर केला, त्याबरोबर वायूने पुनः जोराने वाहण्यास सुरुवात केली, त्यासरशी एक टेकडी तिरुपती किंवा वेंकटाचल या ठिकाणी पडली.

तिरुपतीच्या टेकडीची चारी युगांत प्रसिद्धी होती. कृतयुगात ती वृषभाचल, त्रेतायुगात अंजनाचल, द्वापारयुगात शेषाचल आणि चालू कलियुगात वेंकटाचल म्हणून हे स्थान प्रसिद्ध आहे.

या टेकडीला वृषभाचल हे नाव कसे पडले, याबद्दल ब्रह्मांड पुराणात पुढील उल्लेख सापडतो :

वृषभासुर नावाचा एक शंकराचा मोठा भक्त होता. तो तिरुपतीच्या दक्षिणेला राहत असे व ऋषींना उपद्रव देत असे. एके दिवशी त्याला ही टेकडी वाढत असताना दिसून आली. वृषभासुराला वाटले की, कोणी तरी जादू करून ही टेकडी वाढविली असावी. तेव्हा ज्याने ही टेकडी वाढविली आहे, तो कोणी का असेना, आपण त्याच्याशी लढाई करायची. तेव्हा त्याने त्या टेकडीची उत्पत्ती कोणी केली त्याचा शोध काढला. रानात शिकार करीत असतानाच देवांनी ही टेकडी निर्माण केली आहे, असे त्याला कळून आले. वृषभाने देवांशी लढाई सुरू केली. देवांनी विष्वक्सेनाच्या मदतीने वृषभासुराच्या सैन्याचा पुरा मोड केला. तेव्हा वृषभासुराने आपल्या मायेने दुसरे मोठे सैन्य निर्माण केले आणि तो त्या सैन्यातच गुप्त झाला. देवाने आपल्या हातातील चक्राने सेनेचा धुव्वा उडविला; तेव्हा वृषभासुराला असे आढळून आले की, आपण

नारायणाबरोबर लढत आहोत. तेव्हा तो देवाचा भक्त बनला. या देवाच्या हातून जर आपणाला मरण आले तर आपणाला मोक्ष मिळेल. तेव्हा "आपल्या हातून मला मरण यावे," अशी त्याने देवाजवळ प्रार्थना कली. त्याच्या विनंतीप्रमाणे देवाने आपल्या हातातील सुदर्शन चक्राने वृषभासुराला ठार केले. यामुळे देवाला 'वृषभासुरहारी' असे नाव मिळाले. तेव्हापासून भक्त लोक 'ॐ वृषभासुरहारिणे श्रीव्यंकटेशाय नमः' असे म्हणून देवाची भक्ती करतात.

भविष्य पुराणात ही कथा खालीलप्रमाणे आहे :

वृषभासुर हा शाळिग्रामाची पूजा करून पाच हजार वर्षे तपश्चर्या करीत होता. दररोज तो आपले शिर देवाला अर्पण करीत असे आणि देवाच्या कृपेने रोज नवे शिर तेथे उत्पन्न होत असे. ही त्याची तपश्चर्या पाहून श्रीनिवास त्याला प्रसन्न झाले. त्याने वृषभासुराला दर्शन देऊन वर मागण्यास सांगितले. वृषभासुराने देवाशी युद्धाची भिक्षा मागितली. कारण त्यामुळे देवाच्या हातून मृत्यू आला म्हणजे आपणास मोक्ष मिळेल अशी त्याची कल्पना होती. देवाने त्याची विनंती मान्य केली. अशा रीतीने देवाला 'वृषभासुरहारी' असे नाव पडले; तसेच या टेकडीला वृषभाचल असे नाव पडले.

त्रेतायुगात या टेकडीला अंजनाचल असे नाव मिळाले व देवाला 'अंजना'गोत्रपती असे नाव मिळाले. भक्त लोक 'ॐ अंजनागोत्रपतये श्रीव्यंकटेशाय नमः' असे म्हणून देवाची पूजा करतात.

ब्रह्मांड पुराणात यासंबंधी पुढील आख्यायिका आहेः त्रेतायुगात केसरी नावाचा एक असुर होता. तो शिवाचा मोठा भक्त होता. त्याने शंकराची मोठी तपश्चर्या केली. शंकराच्या वराने पुत्रप्राप्ती व्हावी, अशी त्याची इच्छा होती. शंकराने त्याला सांगितले की, तुझ्या नशिबात मुलगा नाही; पण मुलगी आहे. तिच्यापासून तुला नातू होईल. पुढे त्याला मुलगी झाली. तिचे नाव अंजना होते. जेव्हा ती मोठी झाली, तेव्हा तिचे लग्न केसरी या नावाच्या एका वानराबरोबर झाले. अंजनादेवीला बरेच दिवसात पुत्र झाला नाही. एके दिवशी धर्मदेव वेष बदलून तिथे आले व ते तिला म्हणाले, " या व्यंकटाचलावरील आकाशगंगा तळ्याच्या किनाऱ्यावर जर तू तपश्चर्या करशील, तर तुला पुत्र होईल. तिने त्या तळ्याच्या काठी सात हजार वर्षे तपश्चर्या केली. दररोज वायुदेव तेथे येऊन तिला अन्न म्हणून एक फळ देऊन जात असे. तिची तपश्चर्या पाहून शंकर व पार्वती प्रसन्न झाली व त्यांनी तिला पुत्रप्राप्तीचा वर दिला आणि एके दिवशी सूर्योदयाच्या वेळी तिला मुलगा झाला.त्याचे नाव आंजनेय. त्याचेच दुसरे नाव हनुमान. या अंजनीसुताने जन्मल्याबरोबर आकाशात उगवणारा सूर्य पाहिला. त्याला ते लालभडक, पिकलेले फळ वाटले म्हणून ते घेण्यासाठी त्याने उड्डाण केले. परंतु सूर्याची उष्णता सहन न होऊन तो परत पृथ्वीवर आला. अंजना देवीला या टेकडीवर तपश्चर्या करून मुलगा झाला, म्हणून या टेकडीला अंजनाचल असे नाव मिळाले.

नारायणाबरोबर लढत आहोत. तेव्हा तो देवाचा भक्त बनला. या देवाच्या हातून जर आपणाला मरण आले तर आपणाला मोक्ष मिळेल. तेव्हा "आपल्या हातून मला मरण यावे," अशी त्याने देवाजवळ प्रार्थना कली. त्याच्या विनंतीप्रमाणे देवाने आपल्या हातातील सुदर्शन चक्राने वृषभासुराला ठार केले. यामुळे देवाला 'वृषभासुरहारी' असे नाव मिळाले. तेव्हापासून भक्त लोक 'ॐ वृषभासुरहारिणे श्रीव्यंकटेशाय नमः' असे म्हणून देवाची भक्ती करतात.

भविष्य पुराणात ही कथा खालीलप्रमाणे आहे :

वृषभासुर हा शाळिग्रामाची पूजा करून पाच हजार वर्षे तपश्चर्या करीत होता. दररोज तो आपले शिर देवाला अर्पण करीत असे आणि देवाच्या कृपेने रोज नवे शिर तेथे उत्पन्न होत असे. ही त्याची तपश्चर्या पाहून श्रीनिवास त्याला प्रसन्न झाले. त्याने वृषभासुराला दर्शन देऊन वर मागण्यास सांगितले. वृषभासुराने देवाशी युद्धाची भिक्षा मागितली. कारण त्यामुळे देवाच्या हातून मृत्यू आला म्हणजे आपणास मोक्ष मिळेल अशी त्याची कल्पना होती. देवाने त्याची विनंती मान्य केली. अशा रीतीने देवाला 'वृषभासुरहारी' असे नाव पडले; तसेच या टेकडीला वृषभाचल असे नाव पडले.

त्रेतायुगात या टेकडीला अंजनाचल असे नाव मिळाले व देवाला 'अंजना'गोत्रपती असे नाव मिळाले. भक्त लोक 'ॐ अंजनागोत्रपतये श्रीव्यंकटेशाय नमः' असे म्हणून देवाची पूजा करतात.

ब्रह्मांड पुराणात यासंबंधी पुढील आख्यायिका आहे: त्रेतायुगात केसरी नावाचा एक असुर होता. तो शिवाचा मोठा भक्त होता. त्याने शंकराची मोठी तपश्चर्या केली. शंकराच्या वराने पुत्रप्राप्ती व्हावी, अशी त्याची इच्छा होती. शंकराने त्याला सांगितले की, तुझ्या नशिबात मुलगा नाही; पण मुलगी आहे. तिच्यापासून तुला नातू होईल. पुढे त्याला मुलगी झाली. तिचे नाव अंजना होते. जेव्हा ती मोठी झाली, तेव्हा तिचे लग्न केसरी या नावाच्या एका वानराबरोबर झाले. अंजनादेवीला बरेच दिवसात पुत्र झाला नाही. एके दिवशी धर्मदेव वेष बदलून तिथे आले व ते तिला म्हणाले, " या व्यंकटाचलावरील आकाशगंगा तळ्याच्या किनाऱ्यावर जर तू तपश्चर्या करशील, तर तुला पुत्र होईल. तिने त्या तळ्याच्या काठी सात हजार वर्षे तपश्चर्या केली. दररोज वायुदेव तेथे येऊन तिला अन्न म्हणून एक फळ देऊन जात असे. तिची तपश्चर्या पाहून शंकर व पार्वती प्रसन्न झाली व त्यांनी तिला पुत्रप्राप्तीचा वर दिला आणि एके दिवशी सूर्योदयाच्या वेळी तिला मुलगा झाला.त्याचे नाव आंजनेय. त्याचेच दुसरे नाव हनुमान. या अंजनीसुताने जन्मल्याबरोबर आकाशात उगवणारा सूर्य पाहिला. त्याला ते लालभडक, पिकलेले फळ वाटले म्हणून ते घेण्यासाठी त्याने उड्डाण केले. परंतु सूर्याची उष्णता सहन न होऊन तो परत पृथ्वीवर आला. अंजना देवीला या टेकडीवर तपश्चर्या करून मुलगा झाला, म्हणून या टेकडीला अंजनाचल असे नाव मिळाले.

श्रीव्यंकटेश, श्रीनिवास हे या शेषाचल पर्वतावर कसे राहावयास आले यासंबंधी पुराणांतून अनेक वर्णने आली आहेत. ती 'व्यंकटाचलमाहात्म्य' म्हणून प्रसिद्ध आहेत. पद्मपुराणात असे वर्णिले आहे : "एकदा मनूने एक यज्ञ सुरू केला. तेथे जमलेल्या ऋत्विजांमध्ये असा एक वाद निर्माण झाला की, ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तीन देवांमध्ये श्रेष्ठ देव कोणता ? या विषयावर एकमत होईना. तेव्हा जमलेल्या ऋषींनी सत्यसंशोधनाचे काम भृगू ऋषींकडे सोपविले. शंकराची भेट घेण्याकरिता प्रथम ते कैलासावर गेले. नंदी त्यांना आत प्रवेश देईना. भृगूंनी कसा तरी प्रवेश मिळविला; पण पाहतात तो शंकर आणि पार्वती हे सारीपाट खेळण्यात इतके दंग झाले होते की, त्यांना भृगू ऋषींकडे पाहण्यास वेळच नव्हता. भृगू ऋषींना या गोष्टीचा राग आला आणि शंकराला शाप देऊन ते ब्रह्मदेवाकडे गेले. पण "भृगू म्हणजे काय, आपला एक मुलगा, त्याच्याकडे काय एवढे लक्ष द्यावयाचे आहे ?" अशा विचाराने ब्रह्मदेवाने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. ब्रह्मदेवालाही शाप देऊन अखेर ते वैकुंठावर विष्णूची भेट घेण्यास गेले. तेथे पाहतात तर विष्णू गाढ झोपी गेलेले. भृगूंना भयंकर संताप आला आणि त्या संतापाच्या भरात त्यांनी विष्णूला लाथ मारली. विष्णूच्या छातीवर ती लाथ इतक्या जोराने लागली की, त्या आघाताचे चिन्ह त्यांच्या छातीवर उमटले. या चिन्हाला 'श्रीवत्सलांच्छन' असे म्हणतात. विष्णू शांतपणे उठले. रागावण्याऐवजी त्यांनी भृगूच्या पायाला लागले तर नाही ना, याची आधी चौकशी केली.

जगाची काळजी घेण्याऐवजी गाढ झोपल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. या वागण्याने भृगू शांत झाले. विष्णूने आपला अपमान गिळला आणि आपल्याला आपल्या कर्तव्याची जाणीव करून दिल्याबद्दल त्यानेही भृगूंना धन्यवाद दिले. लक्ष्मी त्यांच्याजवळच होती. तिलाही भृगूंच्या लाथेचा थोडा प्रसाद मिळाला होता. तिला भृगूंचे हे वागणे आवडले नाही, भृगूंनी केलेल्या भयंकर अपमानाबद्दल त्यांची कानउघाडणी करायचे सोडून विष्णू भृगूंचीच बाजू घेऊ लागले. हे पाहून लक्ष्मी विष्णूशी भांडली व भृगूंच्या वागण्याचा तिटकारा येऊन ती वैकुंठाहून दूर निघून गेली. त्यामुळे विष्णूला वैकुंठात एकट्याला करमेना. तेव्हा तो वैकुंठाहून निघाला व आपला वेळ आनंदात घालविण्यासाठी शेषाचलावर येऊन उतरला. रुसलेल्या पद्मावतीचे स्थान व्यंकटेशापासून तीन-चार मैल दूर आहे.

प्रथम विष्णू आदि-वराहाच्या रूपाने आला व महासागरात बुडणाऱ्या पृथ्वीला त्याने आपल्या दातांवर तोलून धरले. पुढे अनेक वर्षांनंतर भक्तांच्या समाधानासाठी विष्णू हा श्रीनिवास आणि लक्ष्मी ही भूदेवी या स्वरूपांत शेषाचलावर येऊन गुप्तपणे राहिली. पुष्कळ वर्षे लोटली. तेथील स्थानिक राजाच्या गायी त्या टेकडीवर चरायला येत असत. शेषाचलावरील एका विशिष्ट ठिकाणी आल्यावर त्यांना आपोआप पान्हा फुटे व तेथे त्या आपल्या दुग्धधारा सोडीत. त्यामुळे सायंकाळी घरी आल्यानंतर त्या दूध देत नसत. ही गोष्ट राजाच्या लक्षात आली.

या गोष्टीची चौकशी करण्यासाठी राजा समक्ष तेथे आला. त्याने त्या विशेष ठिकाणी खोदले. तर त्याला देवाची– श्रीनिवासाची मूर्ती सापडली. त्याने त्याच ठिकाणी त्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून तिरुपतीचे मंदिर बांधले.

**इतिहासाच्या साक्षी :**

मूर्तीची प्रतिष्ठापना करणारा हा राजा 'तोंडमन' या नावाचा होता, असे म्हणतात. ही गोष्ट जरी दंतकथेच्या स्वरूपाची असली तरी तिला वस्तुस्थितीचा आधार असावा आणि भूमीतून उत्खनन करून मूर्ती वर काढून प्रथम मंदिर बांधल्याची घटना इ. स. पूर्व ५७ ते इ. स. ७८ च्या दरम्यानच्या काळात घडली असावी, असे अभ्यासकांना वाटते.

तिरुपतीचे मंदिर नक्की केव्हा बांधले गेले याबद्दल निश्चित माहिती मिळत नाही. हे स्वयंभू व अनादी कालापासूनचे स्थान आहे, असेच मानले जाते. आळवार संत आणि निरनिराळे वैष्णव आचार्य यांनी मोठ्या भक्तिभावाने आपापल्या काव्यांमधून व्यंकटाचलाचे व तेथील श्रीनिवासाचे गुणगान केले आहे. परमेश्वराचे सौंदर्य, त्याचा दयाळूपणा आणि भक्तांविषयीचे प्रेम या गोष्टींनी ही पदे ओथंबलेली आहेत.

आतापर्यंत लक्षावधी भक्तांनी आणि अनेक राजेरजवाड्यांनी येथील मंदिराची बांधकामे केली, ती दुरुस्त केली, पुन्हा वेगळ्या तऱ्हेने बांधली, यामुळे तेथे आज दिसणारे बांधकामाचे वैभव हे वेगवेगळ्या काळच्या

शिल्पकामाचे मिश्रण आहे. चोल राजे, विजयनगरचे राजे आणि त्यानंतरच्या अर्वाचीन काळातले राजे यांनी केलेली बांधकामे आज आपणांला शेजारी शेजारी आढळतील.

आठव्या शतकापर्यंतचे सापडणारे उल्लेख हे व्यंकटाचल टेकडी आणि श्रीनिवास मूर्ती यांबद्दलचे असून, त्यांत मंदिराबद्दलचा फारसा उल्लेख नाही. यावरून आठव्या शतकापर्यंत येथे फारसे मोठे मंदिर नसावे, असे अनुमान निघते. येथील जुन्यातला जुना शिलालेख इसवी सन ७९० चा आढळतो. इ. सन ८२६ मध्ये तिरुचानूर येथे एक मंदिर बांधले गेले. कारण शेषाचल टेकडी ही भक्तांना चढून जाण्यास अतिशय कठीण अशी होती. इ. स. ९६० मध्ये तिरुमलाई नंबी याने टेकडीवर मूळ ठिकाणी मूर्तीची स्थापना केली. पुढे रामानुजाचार्य यांनी येथील देवळाचा विस्तार केला व येथील धार्मिक विधींना व्यवस्थितपणा आणला.


नवव्या शतकातील कांचीचे पल्लव राजे, मदुरेचे पांड्य राजे, चौदाव्या आणि पंधराव्या शतकांतील विजयनगरचे राजे हे सर्व राजे तिरुपतीच्या व्यंकटेशाचे भक्त आणि उपासक होते. विजयनगरच्या साम्राज्याच्या वैभवाच्या काळात तर तिरुपतीवर देणग्यांचा वर्षावच झाला. विजयनगरचा प्रसिद्ध सम्राट कृष्णदेवराय आणि त्याच्या चिन्नादेवी आणि तिरुमलादेवी या दोन राण्या यांचे धातूचे पुतळे आजही तिरुपतीला आढळतात. अनेक राजेरजवाड्यांनी आणि मंत्रिगणांनी तिरुपतीला येऊन

आपली व्यंकटेशाबद्दलची भक्ती व्यक्त केली आहे. मराठी राजे रघूजी भोसले यांनी नित्याच्या पूजेची व्यवस्था लावून दिली होती आणि एक मौल्यवान पाचूचा खडाही देवाला अर्पण केला होता. म्हैसूरच्या आणि गढवालच्या राज्यकर्त्यांनीही या देवस्थानला मोठ्या देणग्या दिल्या होत्या. इस्लामी राज्यकर्त्यांच्या मूर्तिभंजक हातांचा स्पर्शही व्यंकटेशाला झाला नव्हता. कारण अल्लाउद्दिन खिलजी आणि त्याचा प्रधान मलिक काफूर यांनी दक्षिण भारतावर स्वारी केली त्या वेळी ते तिरुपती वगळून वेगळ्या मार्गांनी आले आणि गेले. त्यांच्या नंतरच्या



कृष्णदेवरायाचा धातूचा पुतळा, तिरुपती

देशी आणि इंग्रजी राज्यकर्त्यांनी या देवस्थानच्या रक्षणाकडेच आपले लक्ष दिले होते. तिरुपती हे मध्ययुगीन धर्मवेडया राज्यकर्त्यांच्या तावडीतून निसटलेले अपवादात्मक असे देवस्थान असून आजही ते वैभवशालीपणात अग्रेसर आहे. राजेरजवाडे, श्रीमंत, सावकार आणि सामान्य जन यांच्या दानधर्माच्या गंगौघामुळे आजही तिरुपती संस्थानची आर्थिक स्थिती सारखी भरभराटीला येत आहे.



आतील गोपूर व विजयस्तंभ

सुंदर पांड्य याने (इ. स. १२६२) मंदिराच्या कळसाला सोन्याचा मुलामा केल्याचा उल्लेख आहे. वीर नरसिंह यादवराय याने येथे आपली सुवर्णतुला केली आणि त्या सुवर्णाचा उपयोग मूर्तीच्या शृंगारासाठी केला. विजयनगरचा प्रसिद्ध राजा कृष्णदेवराय हा सात वेळा दर्शनासाठी आला होता. एकदा तर त्याने देवाला सुवर्णाभिषेक केला होता. कृष्णदेवरायाला लढाईत विजय

मिळाला की तो तिरुपतीला यायचा आणि देवदर्शन करून देवाचा उत्तराई व्हावयाचा.


इ. स. १८४३ साली ईस्ट इंडिया कंपनीने आपली देवस्थानवरील हुकमत 'हाथीरामजी मठा'कडे सुपूर्त केली. इ. स. १९३६ साली मद्रास राज्याच्या कायदे-मंडळाने एक कायदा करून 'तिरुमलै-तिरुपती-देवस्थान कमिटी' स्थापन केली. ती देवस्थानचा सारा कारभार-पाहते. मद्रास सरकारचा एक कमिशनर या देवस्थान-समितीचा प्रमुख म्हणून कारभार पाहतो. इ. स. १९५१ पासून ट्रस्टींची कमिटी आणि सरकारचा एक कार्यकारी अधिकारी मिळून सध्या कारभार पाहतात.

**गिरीवर जाण्याच्या सोयी :**

तिरुपती स्टेशनपाशी संस्थानची एक मोठी धर्मशाळा आणि वाहतुकीसंबंधाचे मुख्य केंद्र आहे. व्यंकटेशगिरीवर जाण्यासाठी या ठिकाणाहून दर अर्ध्या-अर्ध्या तासाने मोटरी निघतात. देवस्थानच्या मोटरी सुमारे चाळीसपन्नास असून त्यांच्याशिवाय इतर कोणाही सर्व्हिस मोटरला गिरीवर जाता येत नाही. खासगी गाड्यांची किंवा टॅक्सींची गोष्ट निराळी. येथे वशिला चालत नाही. ओळीने गटागटांतून यात्रेकरू एकत्र आणून त्यांना रांगेने मोटरमध्ये प्रवेश दिला जातो. मोटरमार्ग सर्व घाटातून असून रस्ता डांबरी उत्तम राखला आहे. दिवसेंदिवस यात्रेकरूंची संख्या येवढी वाढत आहे की, या वाढत्या यात्रेच्या वाहतुकीसंबंधी कशी व्यवस्था करावी, हा एक

पेचप्रसंग उत्पन्न झाला आहे. इतकी ही वाढती संख्या सर्व वर्षभरही चालू राहिली आहे.

यात्रेकरू प्रथम दर्शनी गोविंदराजाच्या दर्शनास जातात. गोविंदराजाचे भव्य देऊळ स्टेशनपासून दोन-तीन फर्लांगांवर आहे. गोविंदराजाची मर्ती (शेषशायी) दगडी असून



गोविंदराज मंदिराचे शिखर आणि कुंड

गाभारा व देवळाचा प्राकार अत्यंत विस्तृत आहे. गोविंदराज हा व्यंकटेशाचा थोरला भाऊ, तेव्हा त्याचे दर्शन प्रथम, नंतर व्यंकटेशाचे व नंतर तीन-चार मैलांवर असलेल्या पद्मावतीचे दर्शन घ्यावयाचे अशी प्रथा आहे. या तिन्ही देवतांच्या दर्शनाशिवाय यात्रेची सांगता होत नाही.

गिरीवर पायी चढून जाण्याचा पायऱ्या-पायऱ्यांचा एक खडा मार्ग आहे. भाविक यात्रेकरू दरसाल अनवाणी या मार्गानेच जातात. या मार्गे अंतर फक्त सातआठ मैल

पडते; पण तेच मोटरने वळसा पडल्याने सुमारे पंधरा मैल होते. यात्रेला जायचे तर कष्ट पडले पाहिजेत, म्हणून अनवाणी चालत जाऊन दर्शन घेण्याची पद्धत. ती अजूनही अनेक भाविक यात्रेकरू अनुसरतात.

गिरीवर गेले की देवस्थानतर्फे उतरण्यासाठी छोटे छोटे बंगले बांधले आहेत. त्यांत राहण्याची व्यवस्था उत्तम होते. रोजचे भाडे नाममात्र पडते; पण आतील व्यवस्था उत्तम असते. पाणी, भांडीकुंडी सर्व मिळते. देवस्थानने केलेल्या या सोयीमुळे अनेक यात्रेकरूंना मुक्काम करून राहण्याची सोय झाली आहे. त्यामुळे पुजाऱ्यांच्या कटकटी, देणे-घेणे यांसंबंधी काही गैरसोय होत नाही.

**देवळाभोवतालचे वातावरण :**

अगदी पहाटेपासून व्यंकटेशाच्या काकड-आरतीला सुरवात होते. या काकडआरतीस अनेक भक्त जमतात. दूरध्वनिक्षेपणयंत्रावरून तेलगू व संस्कृत भाषांतून खड्या पण मधुर सुरात स्तोत्रे, भूपाळ्या म्हटल्या जातात. त्यांचा आवाज भोवताली सर्वत्र ऐकू येतो. पहाटेच्या सुरम्य वेळी मंगल प्रसन्न वातावरण उत्पन्न होते; फुलांचा व चंदनउटीचा कर्पूरमिश्रित सुवास सर्वत्र दरवळलेला असतो. "व्यंकटरमणा गोविंदा" या जयघोषाने सर्व यात्रेकरू भारून गेलेले असतात.

देवळाजवळ असलेल्या कुंडात स्नान करून पूजेअर्चेचे साहित्य घेऊन यात्रेकरू रांगेने उभे असतात. मुक्तदर्शना-च्या वेळी सर्वांना मोफत दर्शन घेता येते. पण गर्दी

इतकी असते की काही काही वेळा दर्शन घडण्यास बराच काळ तिष्ठत उभे राहावे लागते. यात्रेकरू हे सर्व आनंदाने सहन करीत असतात. प्रदक्षिणेच्या दर्शनवाटेवर भितीवरून पुराणांतील, रामायण-महाभारतांतील अनेक प्रसंगांची भव्य चित्रे रेखाटली आहेत. त्यांतील कथा मुक्त कंठाने भाविकपणे यात्रेकरू एकमेकांना सांगत असतात. त्यामुळे कंटाळवाणे वाटत नाही. करमणूक करायला जवळ माकडे भरपूर. त्यांच्या मर्कटलीला सदैव चालू असतात. स्त्रियांच्या डोक्यांतील फुले, वेण्या, गजरे, डोळ्यांवरील चश्मे, हातांतील पूजेचे साहित्य, नारळ, खोबरे, केळी यांच्यावर त्यांचे राजरोस हल्ले चालू असतात. माकडे इतकी धीट की, भर गर्दीत झोंबाझोंबी करून खाद्य पटकावल्याशिवाय राहत नाहीत. या त्रासामुळे असो, की अन्य काही कारणामुळे असो; पण स्त्रियांनी दर्शनास येताना डोक्यात फुले, गजरे वगैरे माळावयाचे नाहीत, असा प्रघात येथे पडला आहे.


**दर्शनसुखाचा सोहळा** :

काही काळ प्रदक्षिणेच्या वाटेवर तिष्ठत उभे राहिल्याचे समाधान व्यंकटेशाची मूर्ती जशी जवळजवळ येऊ लागते तसतसे होत राहते; डोळे अधीर होतात, उत्सुकता शिगेला पोचते आणि मग आपली वेळ आली की ते व्यंकटेशाचे नयनरम्य, भव्य, गोजिरे रत्नजडित स्वरूप पाहून डोळ्यांचे पारणे फिटते. नयनांतून अश्रू ओघळू लागतात. सर्व श्रमांचेच काय, पण जीवनाचे सार्थक झाले, असे वाटू लागते. शंख-चक्र-गदा-पद्मधारी व्यंकटेशाची

रत्नजडित मूर्ती रम्य आहे.

देवाची मूर्ती आत गाभाऱ्यात असून तिचे ध्यान उभे आहे. मूर्ती काळ्या शाळिग्राम पाषाणाची असून तिची उंची सात-आठ फूट आहे. मूर्तीला चार हात असून उजव्या हातात शंख आणि डाव्या हातात चक्र ही आयुधे आहेत. उरलेल्या दोन हातांपैकी एका हाताने पृथ्वीकडे निर्देश केला असून चौथ्या डाव्या बाजूच्या हातात कमळ आहे. ही मूर्ती विष्णूची असून तिला श्रीनिवास स्वामी, व्यंकटाचलपती, व्यंकटेश्वर स्वामी, शेषाचलपती, बालाजी वगैरे एक हजार आठ नावे आहेत. देवाच्या अंगावर सोन्याचे, हिऱ्याचे आणि रत्नांचे विपुल अलंकार आहेत. मूर्तीच्या पायांत सोन्याच्या साखळ्या आणि पैंजण आहेत. देवाची उपकरणी, भांडी, काही चांदीची आणि काही सोन्याची आहेत.

व्यंकटेशाच्या नयनांवर सदा एक पांढरी झापड असते. कोणा एका भक्ताने पूर्वी हे स्वरूप पाहिले त्या वेळी सूर्य-चंद्रांच्या तेजासारख्या ज्योतीने त्याची दृष्टी दिपू लागली. तो भक्त म्हणू लागला 'भगवन, तुमचे हे साधे रूप जर असे, तर मग विश्वरूपदर्शनकाळी तुम्ही कसे दिसत असाल! आम्ही सामान्य मानव. आम्हांला सगुण साजिरे सुहास्य वदन व मंगल दृष्टी असलेले तुमचे स्वरूपच नेहमी दृष्टीस पडू दे. कृपा करून सौम्य दृष्टीने आम्हा भक्तांवर तुझी अमृत-दृष्टी होवो.' या त्याच्या प्रार्थनेनंतर व्यंकटेशाच्या मूर्तीच्या डोळ्यांवर एक स्वच्छ शुभ्र आवरण घालण्यात येऊ लागले. पूर्वकाळापासून पडलेली ही प्रथा अजून चालू आहे. पण या कथेला ऐतिहासिक किंवा पौराणिक आधार नाही.




श्रीव्यंकटेशाची मूर्ती

देवालयाभोवतालची प्रदक्षिणेची वाट भरपूर रुंद आहे. उत्सवप्रसंगी देवाची पालखी या मार्गाने वाजत गाजत थाटाने निघते. भोवताली अनेक देवळे आहेत. निरनिराळ्या वस्तूंची दुकाने थाटलेली आहेत. प्रमुख दरवाजासमोरील वाटेवर बाराही महिने लग्ने लावली जातात. येथे साजऱ्या होणाऱ्या लग्नांना मुहूर्त पाहावा लागत नाही. येथे सदाच शुभ काल मानला जातो. मंगलकार्ये बाराही महिने धूमधडाक्याने चालू असतात.

**कापुराची उटी :**

या देवळात देवाचे सर्वांग कापराने माखण्याची चाल आहे. या चालीसंबंधात अशी कथा आहे : पूर्वी एकदा एका ब्राह्मण भक्ताने देवळाजवळ विहीर किंवा तळे खोदण्याची शपथ घेतली. तो अतिशय गरीब असल्याने त्याने स्वतःच तळे खोदण्यास सुरुवात केली. त्याच वेळी त्याची पत्नी गरोदर होती. आपल्या गरोदर पत्नीलाही त्याने या कामाला जुंपले. जेव्हा त्या पत्नीला कामाचा त्रास होऊ लागला, तेव्हा देवाने एका ब्राह्मण तरुणाचे रूप घेतले व तो त्या पत्नीला माती वाहून नेण्याच्या कामात मदत करू लागला. त्या गरीब ब्राह्मणाच्या जेव्हा हे लक्षात आले तेव्हा त्याला, या तरुण ब्राह्मणाचा संशय आला. देवाच्या कामात तो भागीदार झाल्याचे त्याला सहन झाले नाही. म्हणून त्याने हातातल्या कुदळीने त्या तरुण ब्राह्मणाला मारले. काम संपल्यानंतर तो गरीब ब्राह्मण जेव्हा देवळात देवाच्या प्रार्थनेसाठी गेला तेव्हा त्याला असे आढळले की

आपण त्या तरुण ब्राह्मणाला नेमके ज्या ठिकाणी मारले होते, नेमके त्याच ठिकाणी देवाच्या मूर्तीतून रक्त वाहत आहे. हे पाहून त्याला अतिशय आश्चर्य वाटले. नंतर त्याच्या लक्षात आले की, प्रत्यक्ष देवाने तरुण ब्राह्मणाचे रूप



सहस्रस्तंभी मंडप

घेऊन आपल्याला आपल्या कामात मदत करून उपकृत केले आहे. गरीब ब्राह्मणाने ताबडतोब जेथून रक्त वाहत होते तेथे कापूर बसविला व रक्त वाहण्याचे बंद केले. तेव्हा-पासून देवाच्या सर्वांगाला कापूर लावण्याचा प्रघात पडला.

## श्रीरामानुजाचार्यांचे कार्य :

तिरुपती येथील मूर्तीला जे पूजा, अर्चा आणि उपचार केले जातात त्यांची माहिती 'व्यंकटाचल इतिहास माला' या ग्रंथात दिली आहे. याचे एकंदर सात भाग आहेत.

पहिले तीन भाग वैष्णव संप्रदायाबद्दलचे आहेत. उरलेल्या चार भागांत रामानुजाचार्यांनी व त्यांच्या नंतर त्यांचे शिष्य अनंताचार्य यांनी देवळाबद्दल ज्या गोष्टी केल्या, त्यांची माहिती दिली आहे. दर शुक्रवारी मूर्तीला विधियुक्त स्नान घातले जाते. देवाच्या कपाळावर चार दिवस ऊर्ध्व पुंड्र लावायचा. सोमवारपासून तीन दिवस गंधपूजा (गोपीचंदनपूजा) होते. गुरुवारी मूर्तीच्या अंगावरील सर्व अलंकार काढून मूर्तीला फुलांची पूजा करायची. रोज म्हणावयाची स्तोत्रेसुद्धा रामानुजाचार्यांनी ठरवून दिलेली आहेत. रामानुजांनी गोविंदराजाचे मंदिर बांधले व देवळाच्या उपयोगासाठी दोन विहिरी खोदल्या. तसेंच त्यांच्या पायऱ्यांशी श्रीनिवास व भूदेवी यांच्या मूर्ती बसविल्या व देवाचा निर्माल्य या विहिरीत टाकावा, असा प्रघात सुरू केला.

श्रीव्यंकटेश्वराच्या मूर्तीच्या एका हातात 'नागमणी' होता. त्याच्याकडेसुद्धा रामानुजांचे लक्ष होते. त्याबद्दलची अशी आख्यायिका आहे की, वीरसिंह नावाचा राजा होता. तो यात्रा करीत असता तिरुपतीला आला व त्याने एक मनोरा बांधण्याचे काम सुरू केले. हे काम चालू असताना आदिशेष म्हणजे नाग त्याच्या स्वप्नात आला. त्याने राजाला असे सांगितले की, "हे राजा, ही सर्व टेकडी म्हणजे माझेच शरीर आहे. तू आता मनोरा बांधीत आहेस त्याचा बोजा मला सहन करावा लागत आहे." या दृष्टांतानुसार राजाने मनोऱ्याचे बांधकाम थांबविले. आणि आदिशेषाची खूण म्हणून मूर्तीच्या एका दंडांत एक रत्न बांधले.

यासंबंधी दुसरी एक समजूत अशी आहे की, व्यंकटेश्वराचे पद्मादेवीशी जेव्हा लग्न झाले, तेव्हा त्याचे सासरे नागराज यांनी दोन रत्ने भेट म्हणून व्यंकटेश्वराच्या दोन्ही दंडांत बांधली.

श्रीरामानुजाचार्यांनी श्रीनिवासाच्या देवळात बिभीषणाला आश्रय देणाऱ्या रामाची व सीतेची या मूर्ती बसविल्या आहेत.

श्रीरामानुजाचार्यांनी श्रीव्यंकटेशाच्या सेवेसाठी राहणाऱ्या भक्तांसाठीही वागण्याचे नियम घालून दिले होते. प्रत्यक्ष मूर्तीची पूजाअर्चा करणाऱ्या भक्तांनीच तेवढे टेकडीवर राहावे आणि बाकीच्या भक्तांनी टेकडीच्या पायथ्याशी मुक्काम करावा. टेकडीवर आलेल्या भक्तांनी देवाची पूजाअर्चा झाल्यावर देवस्थानाकडून जो प्रसाद दिला जाईल, तोच खावा. घरगुती कामासाठी फुलांचा उपयोग करू नये. सर्व फुलांचा उपयोग देवाच्या पूजेसाठीच करण्यात यावा. टेकडीवर कोणत्याही पक्ष्याची किंवा प्राण्याची शिकार करण्यात येऊ नये. कोणाही मनुष्याला टेकडीवर मृत्यू येऊ नये. आजारी असल्यास त्याला टेकडीच्या पायथ्याशी ठेवावे. स्वामिपुष्करिणीच्या सभोवारच्या सातआठ मैलांच्या परिसरात कोणतेही मंदिर बांधण्यात येऊ नये. हा सर्व परिसर व्यंकटेशासाठी राखून ठेवण्यात यावा. अशा सुधारणा श्रीरामानुजाचार्यांनी त्या काळी भक्तांसाठी घालून दिलेल्या व्यंकटाचल इतिहास मालेत आढळून येतात.

श्रीव्यंकटेशाची मूर्ती हरिहरात्मक आहे, असे वर्णन

जुन्या ग्रंथांतून आढळते. आळवारांनी ती विष्णूची आहे, असे वर्णन केलेले आहे. काहींनी तिच्या ठिकाणी हरिहरांचे संयुक्त रूप वर्णिले आहे. रामानुजांच्या काळात शैवपंथीय लोक ती शंकराची मूर्ती आहे, असे समजून मंदिरावर हक्क सांगू लागले व त्यांनी देवळाचा ताबा घेतला, तेव्हा शैवपंथीय व वैष्णवपंथीय उपासकांच्यामध्ये वाद निर्माण झाला. हा वाद मिटविण्याची कामगिरी रामानुजाचार्यांवर सोपविली गेली. रामानुजांनी दोन्ही पंथांच्या लोकांचे म्हणणे ऐकून घेतले. परंतु त्याविषयी एकमत होईना, तेव्हा त्यांनी एक युक्ती केली. त्यांनी शंकराची आणि विष्णूची आयुधे आणून ती गाभाऱ्यात ठेवून दिली. आणि दरवाजा लावून घेतला. त्यांनी देवाला विनंती केली की, "हे परमेश्वरा, आपली असतील ती आयुधे धारण करा व आम्हां भक्तांना दर्शन द्या." दुसऱ्या दिवशी सकाळी मंदिर उघडून पाहतात तो मूर्तीने शंख आणि चक्र ही आयुधे धारण केलेली आढळली. त्यावरून ही मूर्ती विष्णूची आहे, असा रामानुजाचार्यांनी निर्णय दिला. याबद्दल एक लोकापवाद असा आहे की रामानुजांनी विष्णूची आयुधे धारण करावीत, अशी देवाची तळमळीने प्रार्थना केली म्हणून देवांनी विष्णूची आयुधे धारण केली. दुसरा लोकापवाद असा की रामानुज हे आदिशेषाचे अवतार असल्याने त्यांनी गाभाऱ्यात प्रवेश केला आणि विष्णूची आयुधे मूर्तीच्या अंगावर घातली.

आजही देवाच्या हातात असलेले शंख आणि चक्र मूळ दगडाच्या मूर्तीचे भाग नसून ते सोन्याचे आहेत. देवाच्या

शिरावर जटेसारखा केसांचा झुपका आहे आणि मूर्तीच्या अंगावर नाग कोरलेला आहे. अशा काही चिन्हांवरून ही मूर्ती मूळची शिवाची असावी, असा काही लोक तर्क करतात. येथले मूळचे पुजारी—ज्यांना दीक्षित म्हणतात—ते कपाळावर त्रिपुंड्र म्हणजे उभे गंध लावीत असले तरी ते मूळचे शैव आहेत.

प्रसिद्ध रामानुजाचार्य हे अनेक वेळा तिरुपतीला आले होते. त्यांनीच येथील धार्मिक उत्सवाला व पूजेअर्चेला वैष्णव सांप्रदायिकांचे स्वरूप आणून दिले. रामानुजांनी आनंदनिलय मनोरा दुरुस्त केला. त्यांनी देवी पद्मावतीची मूर्ती असलेला सुवर्णहार देवाच्या गळ्यात घातला, आणि कपाळावर ऊर्ध्व पुंड्र लावण्याची पद्धत सुरू केली. दर गुरुवारी देवाच्या अंगावरील सर्व अलंकार काढून देवाची फुलांनी पूजा बांधायची प्रथा सुरू केली. रामानुजांनी चिदंबरहून गोविंदराजाची मूर्ती आणून ती तिरुपती गावात पायथ्याशी स्थापन केली. ही मूर्ती म्हणजे अनंत-शेषाचीच मूर्ती आहे.

**कल्याणकट्टा आणि क्षौरविधी :**

व्यंकटेशाच्या देवालयाच्या परिसरात कल्याणकट्टा या नावाने प्रसिद्ध असलेली एक व्यवस्था आहे. व्यंकटेश हे कुलदैवत असलेली सर्व हिंदुस्थानात असंख्य कुटुंबे आहेत. काही कुटुंबांतून वंशपरंपरेने अशी एक प्रथा आहे की, देवदर्शनापूर्वी संपूर्ण मुंडन करावयाचे. पुरुष, स्त्रिया, सुवासिनी, लहान मुले, मुली, अर्भके सर्वच मुंडन करून

घेतात. ते कल्याणकट्टयाच्या प्राकारात. ही मुंडन करण्याची व्यवस्था देवस्थानतर्फे कंत्राट देऊन केलेली असून यात्रेकरूंकडून नाममात्र तीन चार आणे घेतले जातात. यांमुळे होणारे उत्पन्न दरसाल लाखो रुपयांचे होते. जमलेल्या केसांची गंगावने तयार करून ती विक्रीस ठेवली जातात. देशात व देशाबाहेर या गंगावनांना मोठी मागणी आहे. यामुळे होणारे उत्पन्न हे देवस्थानचे एक हुकमी उत्पन्न ठरले आहे.

पुरुष, मुले, प्रौढ सारे मुंडन करून घेतात, याचे काही विशेष वाटत नाही, पण मोठ्या, सरदारी, खानदानी घराण्यातल्या सुशिक्षित सौभाग्यवती सुवासिनीदेखील मुंडन करून घेतात, हें पाहून आश्चर्य वाटते. आपल्या दृष्टीला हे खटकते व घृणा वाटते. पण ही प्रथा असलेल्या कुटुंबांना त्यात केवढे समाधान असते, हे त्या कुटुंबाशी समरस होऊन पाहिल्याशिवाय समजणार नाही.

दुसरी एक भावना यामागे संभवते; आपल्याला जे अत्यंत प्रिय ते देवाच्या चरणकमली अर्पण करणे हेच खरे त्यागाचे–समर्पणाचे लक्षण. स्त्रियांना सर्वांत भूषणावह ठरलेला अलंकार म्हणजे त्यांचा केशकलाप. याचाही त्याग करण्यास त्या आनंदाने तयार होत असल्या पाहिजेत. त्यात जुलूमजबरदस्ती असू शकत नाही. त्यामुळे अभागी विधवा तरुणींच्या कपाळी मुंडनाची जबरदस्ती केली जात असे, त्यामुळे जी घृणा उत्पन्न होते, ती येथे होण्याचे कारण नाही. कुटुंबातून चालत असलेला हा कुलाचार किंवा घेतलेली प्रतिज्ञा असावी. कुलाचार मोडणे

भारतीय संस्कृतीत मुरलेल्या भाविक मनाला कदापि रुचणे शक्य नाही. हळूहळू ही प्रथा कमी होत राहील. पण त्यासाठी चळवळ हाती घेऊन पायबंद घालण्याचे काही कारण दिसत नाही. या गोष्टी स्वेच्छेने बंधन म्हणून पाळल्या जातात, असे मानणेच सयुक्तिक ठरेल.


**भोग-प्रसाद :**

भक्तगण देवाला भोग चढवितात. तो प्रसाद म्हणून वाटला जातो. त्यात रोज पंचपक्वान्ने असतात. सर्वसामान्य यात्रेकरूंना वाटण्यासाठी मोफत प्रसाद दिला जातो तो दहिभाताचा, खिचडीचा. या शिवाय यात्रेकरू खर्च करतील त्या प्रमाणे नैवेद्य केला जातो. विशेषत: बुंदीचे आणि मोतीचुराचे लाडू, जिलबी, साखरभात, केशरी भात, मोहनभोग, शिरा वगैरे पक्वान्नांचा नैवेद्य केला जातो. हा नैवेद्य आता बाहेर भक्तांना विकत देण्याची सोय केली आहे. यापासूनही खूपच उत्पन्न मिळते. जो नैवेद्य करतो त्याला देवाचा प्रसाद म्हणून जे ताट वाढून दिले जाते, त्यात चार माणसे सहज जेवण घेऊ शकतील इतके ते भरपूर असते. लाडू नेहमीच्या लाडवांपेक्षा आकाराने तिप्पट-चौपट मोठे असतात. त्यातला एक संपूर्ण खाणे मुश्किलीचे होईल. केशरी भातात अस्सल केशर, बेदाणे, मनुका, काजू, बदाम भरपूर घातले जातात. पक्वान्नांचा सुवास रोज प्रसादाच्या वेळी दरवळत असतो. व्यंकटेशाचे वैभवच आगळे. इंद्रपुरीची झलक जणू त्याने आपल्या

आसमंतात व्यंकटेशगिरीवर उभी केली. भक्तगण एवढ्या-नेच दिपून जातात !

**पद्मावतीचे दर्शन** :

व्यंकटेशाचे दर्शन घेऊन यात्रेकरू पद्मावतीच्या दर्शनास जातात. तिरुपतीहून हे देवस्थान तीन मैल आहे. बसेस सारख्या तासातासाने असतात. भाडे चार आणे आहे. पद्मावती हे लक्ष्मीचे जागृत देवस्थान समजले जाते.



पद्मावतीचे मंदिर व त्याचा परिसर

गोपुरे भव्य असून देवालयासमोर एक सुंदर स्वच्छ पाण्याचे भरलेले सरोवर आहे. सरोवराभोवती सुंदर दगडी कठडा बांधला असून सर्व बाजूंनी, स्नान करण्यासाठी, उतरण्यास घाट बांधले आहेत. पाणी स्वच्छ राहील अशी व्यवस्था आहे. पाणी भरपूर असून त्यात मनमुराद पोहता येते.

देवीची मूर्ती प्रासादिक आहे. देवी नवसाला पावते



श्रीपद्मावती

अशी तिची आख्यायिका आहे. हजारो भक्तगण सतत येत असतात. दर्शनास अडचण पडत नाही. देवीचे दर्शन घेतल्याशिवाय व्यंकटेशगिरीची यात्रा संपूर्ण होत नाही. सफल होत नाही. पद्मावतीला असे वरदान प्रत्यक्ष व्यंकटेशाने दिलेले आहे. त्यामुळे यात्रेकरू या देवीचे दर्शन घेतात; आणि मग तिचा प्रसाद घेऊन यात्रेची सांगता करतात.

**वैभवशाली देवस्थान :**

तिरुमलै तिरुपती देवस्थान हे आंध्रमधील एक अतिशय श्रीमंत असे देवस्थान आहे. कारण येथे येणारे हजारो यात्रेकरू देवस्थानाला मोठमोठ्या देणग्या देतात. टेकडीच्या पायथ्याशी आणि वरही यात्रेकरूंच्या सोयीसाठी धर्मशाळा बांधून ठेवल्या आहेत. ज्या लोकांना पूर्ण शांतता

व एकान्तवास यांची गरज असते, अशा लोकांच्यासाठी देवस्थान कमिटी झोपड्या बांधून देते. जर भक्त सहा हजार रुपये देईल तर देवस्थान कमिटी त्यात आणखी सहा हजारांची भर घालून स्नानगृह, स्वयंपाकगृह यांची सोय असलेली तीन खोल्यांची बंगली त्याच्या नावाने बांधून देते. जेव्हा भक्ताला तेथे स्वतः राहावयाचे नसेल तेव्हा त्याला ती दुसऱ्याला भाड्यानेही देता येते. असे एकंदर सुमारे पाचशे बंगले टेकडीवर आहेत व ते रोजी चार रुपये भाड्याने यात्रेकरूंना राहण्यासाठी मिळतात. याखेरीज सरकारची व देवस्थानची अतिथिगृहे मोठमोठ्या पाहुण्यांसाठी बांधलेली आहेत. गरीब यात्रेकरूंसाठी देवस्थान मोफत राहण्याजेवण्याची सोय करते.

तिरुमलै तिरुपती देवस्थान कमिटी देवस्थानच्या उत्पन्नामधून खालील संस्था आज चालवीत आहे. एक व्यंकटेश्वर ओरिएण्टल रिसर्च इन्स्टिटयूट, व्यंकटेश्वर युनिव्हर्सिटी, दोन हायस्कुले, दोन प्राथमिक शाळा, एक अनाथ विद्यार्थिगृह, एक पाठशाळा, एक व्यंकटेश्वर कॉलेज, एक पदार्थसंग्रहालय आणि एक वाहतूक संस्था. या सर्व गोष्टी पद्धतशीरपणे चालल्या आहेत. अशा रीतीने देवस्थान कमिटी व विश्वस्तांचे मंडळ प्रवाशांच्या सुखसोयींत भर घालण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत.

अखिल भारतात तिरुपतीच्या व्यंकटेश देवस्थानाइतके श्रीमंत देवस्थान दुसरे नाही. जणू कुबेराने आपले भांडार येथे आणून ओतण्याचे ठरविलेले असावे, असे वाटते. दरमहा वीसवीस लाख व विशेष उत्सवांच्या प्रसंगी याहून

जास्त उत्पन्न असणारे दुसरे वैभवशाली देवस्थान कोणते असणार ? पैसे, नाणी, नोटा, दागिने, मोती, रत्ने, जड-जवाहीर, सोने, कापड, पैठण्या, जरतारी खण, वस्त्रेप्रावरणे, भक्तगण देवाच्या चरणी भक्तिभावाने अर्पण करीत असतात. त्यासाठी पंधरा फूट उंचीची एक हुंडी (कणगी) करून ठेवली आहे. त्यात हे सर्व टाकायचे. म्हणजे देवाच्या पदकमली अर्पण होते ही भावना. जितके आपण समर्पण करू त्याच्या किती तरी पटींनी व्यंकटेश आपल्याला देणार आहे, या भावनेने लोक देतच राहतात. द्या म्हणून कोणी सांगावे लागत नाही. कोणी मागतही नाही. याशिवाय पूजा, अर्चा,चंदनअर्चन, दर्शन, हारसमर्पण इत्यादी विविध सोहळे यांसाठी देवस्थानकमिटीत पैसे भरून पास काढावे लागतात ते वेगळे. देवाच्या मूर्तीवरील चंदनगोळ्या, कर्पूर-नेत्रांजन वगैरे विक्रीतून प्राप्ती होते ती वेगळी. देवास जे भोग-नैवद्य अर्पण केले जातात, तेही भक्तगणांना विकले जातात. त्याचे उत्पन्न असेच भरपूर मिळते.

या अवाढव्य उत्पन्नाची मोजदाद, जमाखर्च व त्याचा विनियोग करण्यासाठी स्वतंत्र कमिटी आहे. केवळ पैसे मोजण्यासाठी एक वरिष्ठ मामलेदाराच्या दर्जाचा अधिकारी असून त्याच्या हाताखाली आठ-दहा नोकर असतात. यांचे काम फक्त निरनिराळ्या ठिकाणांहून देवाकडे जमलेले पैसेअडके, नोटा वगैरेंची मोजदाद करण्याचे. पैसे मोजण्याचे काम आनंदाचे असे वाटेल, पण ते या ठिकाणी कठीण होऊन वसते; मग त्यातून मार्ग काढण्यासाठी निरनिराळ्या नाण्यांच्या आकाराच्या भोकांच्या

चाळण्या केल्या आहेत. त्यांतून पैसे, दोन पैसे, पाच पैसे, दहा पैसे, पावली, अधेली ही नाणी चाळून वेगळी केली जातात व तागडीतून वजन करून ते मोजले जातात. हे त्यांचे चाललेले काम मोठे मजेदार असते. शिवाय कापडचोपड, दागिने, सोने यांचे मूल्यमापन करून संस्थानच्या तिजोरीत त्यांचा भरणा करणे हे रोजचे रोज केले तरच आवाक्यात येते. या कार्यासाठी प्रत्यक्ष व्यंकटेशाने कुबेराचीच नेमणूक करावयास हवी !

**उत्पन्नातून देवस्थान कमिटीने केलेली व्यवस्था :**

जसे अवाढव्य उत्पन्न तशा देवस्थानच्या खर्चाच्या बाबीही आवाढव्य. मुख्यतः देवालयातील अंतर्गत पूजे-अर्चेची व उत्सवाची व्यवस्था कमिटीने उत्तम ठेवलेली आहे. जे द्यायचे, अर्पण करायचे, ते देवापुढील बंदिस्त पेटीतून किंवा कणगीत. याशिवाय कोणताही पुजारी, सेवेकरी कोणाकडूनही पैसा मागणार नाही. सर्व व्यवस्था कमिटीकडून पास काढला जाईल त्याप्रमाणे केली जाते. इतकी काटेकोर व्यवस्था दुसरीकडे कोठेही आढळत नाही.

यात्रेकरूंसाठी पाणी, दिवाबत्ती, धर्मशाळा, पर्णकुटी, बंगले, कॅन्टीन, बागा या सर्व सोयी कमिटीने नमुनेदार केल्या आहेत. याशिवाय देवस्थानाच्या उत्पन्नातून वाहतूक व्यवस्था, मोटरी, बसेस वगैरे, रस्तादुरुस्ती, शैक्षणिक केंद्रे, विश्वविद्यालय, दवाखाने, रुग्णालये, अनाथालये, चालविली जातात. हे एक सामाजिक कार्यच होत असते.

युद्धकाळी आणीबाणीची परिस्थिती ओळखून आपल्या

गंगाजळीतून कमिटीने चार-पाच कोटींचे सुवर्णरोखे खरेदी केले होते. हे सर्व विश्रुत आहे. कमिटीवर सर्व देखरेख सरकारी खात्याकडून होते. हे देवस्थान त्यामुळे आंध्र प्रांताचे एक भूषण होऊन राहिले आहे.

या देवस्थानातील सर्व धार्मिक विधी मोठ्या कौशल्याने साजरे केले जातात. तोमलसेवा व अर्चन असा सकाळचा विधी असतो. यानंतर सर्व यात्रेकरूंसाठी मुक्त दर्शनाची वेळ ठेवलेली असते. अशीच संध्याकाळीही सर्वांसाठी मुक्त दर्शनाची वेळ ठेवलेली असते. याखेरीज यात्रेकरूंकडून योग्य किंमत घेऊन निरनिराळ्या पूजा केल्या जातात व त्याची पावती यात्रेकरूंना दिली जाते. निरनिराळे उत्सवही साजरे केले जातात. चैत्र शुद्ध त्रयोदशी ते पौर्णिमेपर्यंत तीन दिवस वसंतोत्सव साजरा केला जातो. नित्योत्सव हा चाळीस दिवसांचा असतो. हा मार्च महिन्यात तेलगू नव्या वर्षापासून सुरू होतो आणि आश्विन महिन्यात नवरात्रात ब्रह्मोत्सव म्हणून दहा दिवसांचा मोठा उत्सव असतो, असे अनेक उत्सव साजरे केले जातात.

तिरुपतीच्या टेकडीवर व पायथ्याशी अनेक पवित्र तीर्थकुंडे आहेत. स्वामी पुष्करिणी तीर्थाच्या काठी वराह स्वामींचे ( विष्णूचे ) देऊळ आहे. स्वामी पुष्करणीचे तळे हे गरुडाने वैकुंठाहून श्रीनिवासाच्या स्नानासाठी आणले अशी कथा आहे. या कुंडात स्नान केल्याने पापे नाहीशी होऊन मोक्ष मिळतो. तसेच येथील स्नानाने वेडेपणाही नाहीसा होतो, अशी याची प्रसिद्धी आहे. टेकडीपासून चार मैलांवर आकाशगंगा नावाचे तीर्थकुंड आहे. या ठिकाणाहून

रोज पूजेसाठी पाणी आणले जाते. तिरुपतीपासून दीड मैलावर कपिलतीर्थ नावाचे तीर्थकुंड आहे. यालाच आळवारतीर्थ असे म्हणतात. पापविनाशिनी नावाचे तीर्थकुंड सुमारे दोन मैलांवर आहे. तिरुपती गावात गोविंदराज पेरुमल आणि कोदंडरामस्वामी यांची प्रसिद्ध देवळे आहेत. गलिगोपूर नावाचा एक मनोरा प्रसिद्ध आहे. देवळापुढील गोपुरात पुराणातील प्रसिद्ध कथा कोरल्या आहेत. सुमारे दीड मैलावर कपिलेश्वराचे शंकराचे प्रसिद्ध देऊळ आहे. तिरुपती गावापासून दोन मैलांवरील तिरुचनुर या गावी व्यंकटेशाची पत्नी पद्मादेवी हिचे देऊळ आहे. हिचे दर्शन घेतल्याशिवाय तिरुपतीची यात्रा पूर्ण होत नाही. तिरुपतिक्षेत्र पाहिले म्हणजे प्राचीन चोल राजे, यादव राजे, विजयनगरचे राजे व साळुव वंशाचे राजे यांच्या वैभवाची आठवण होते.

अखिल भारतातील आणि विशेषतः दक्षिण भारतातील अनेक कुटुंबियांचे व्यंकटेश्वर हे कुलदैवत आहे. सर्वांचा या दैवतावर मोठा विश्वास आहे. तो सर्व दुःखांचा परिहार करतो, असे ते समजतात. ज्या ठिकाणी भक्ताला देवाचा साक्षात्कार होतो आणि ज्या ठिकाणी भक्ताच्या अंतःकरणातील तळमळ व भक्ती प्रतीत होते, असा हा व्यंकटेश आहे. व्यंकटेश्वराच्या मूर्तीला ते प्रत्यक्ष देव समजतात आणि भक्तिभावाने केलेली याचना तो कधीच नाकारीत नाही, याचा भक्तांना अनेक वेळा अनुभव आलेला आहे. भक्तांना अनेक चमत्कार या ठिकाणी आढळून आलेले आहेत व अजूनही येत आहेत.

# २ : कांची

**ततस्तु गौरी मुदिता हरेः पुरस्तत्रैव चैकाम्रतरोरधस्तात्**
**चकार पूजां विधिवद् वृषाकपेस्तदीय सन्दर्शनसौख्यलालसा**

ब्रह्माण्ड पुराण

(पार्वतीला आनंद झाला व तिने कांची येथे श्रीविष्णूच्या समक्ष शंकराची विधियुक्त पूजा केली. ही पूजा तिने एका आम्रवृक्षाखाली केली. )

मद्रासच्या ईशान्येस ७२ किलोमीटर असलेले चिंगलपेठ जिल्हृयातील कांची अगर कांजीवरम हे दक्षिण हिंदुस्थानातील एक प्राचीन शहर आहे. पल्लव राजांची ही प्रसिद्ध राजधानी. भारतवर्षात सात पवित्र स्थळे मानली आहेत. अयोध्या, मथुरा, हरिद्वार, काशी, कांची उज्जैन आणि द्वारका. यांपैकी तीन स्थळे श्रीशिवशंकराला प्रिय आणि बाकीची तीन श्रीविष्णूला प्रिय, पण कांची हे मात्र दोघांनाही प्रिय !

हे शहर दोन विभागांत पसरले असून शिवकांची किंवा मोठी कांची हा एक भाग आणि विष्णुकांची अथवा लहान कांची हा दुसरा भाग. ह्या शहराला काचीपेडु,

काच्छी, कांची, कांचीपुरम वगैरे अनेक नावांनी संबोधले जाई. पल्लव राजांच्या वेळच्या ह्या प्राचीन शहरी शैव, वैष्णव, जैन आणि बौद्ध धर्मियांची अनेक मंदिरे होती. विद्येचे माहेरघर म्हणूनही या शहराची प्रसिद्धी होती, या ठिकाणी सापडलेल्या शिलालेखांवरून दक्षिण भारताच्या प्राचीन इतिहासावर प्रकाश पडतो.

ब्रह्मांडपुराणात पुढील वर्णन आढळते : काशी आणि कांची हे दोन शिवाचे नेत्र असून कांची हे जरी विष्णु-तीर्थ म्हणून प्रसिद्ध असले तरी कल्याणकारी शिवाचे मंगलमय स्थान या दृष्टीने येथे समाधान लाभते.


ह्यूएनत्संग या प्रसिद्ध चिनी प्रवाशाने पुढील गोष्टी नमूद करून ठेवल्या आहेत. सहा मैल विस्तार असलेल्या या शहरी गौतम बुद्धाने भेट दिली. बुद्धधर्माची शिकवण प्रसृत केली. सम्राट अशोकाने या ठिकाणी अनेक स्तूप बांधले. कांची या शहराच्या परिसरात शंभर संघाराम आणि दहा सहस्र महायानपंथी भिक्षू होते.

सुप्रसिद्ध बौद्ध तत्त्वज्ञ ‘ दिङनाग ’ हा कांची शहरात राहत असे. दक्षिण भारतात शैव आणि वैष्णव पंथियांचे धार्मिक पुनरुत्थान झाले तेव्हापासून बौद्ध आणि जैन पंथांचे प्राबल्य हळूहळू कमी होऊ लागले.

तामीळ संत सुंदरमूर्ती नायनार याने या ठिकाणी त्रेसष्ट शैवपंथीय शिवभक्त होते असे नमूद केले आहे. त्यांपैकी सहाजण तोंडाई-मंडलम् भागातील राजधानीच्या कांची शहराचे रहिवासी होते.

कांची शहरी आळवार पंथीय महंत पोयीगई आळवार

पेई आळवार, पेय आळवार इत्यादी वैष्णवपंथीय संत, आणि तिरुमलिसई आणि तिरुमंगई असे गोड गळ्याचे संगीतज्ञ संत राहत असत.



कैलासनाथ मंदिर कांची

पल्लव राजघराण्यात राजा महेंद्रवर्मा – पहिला ( इ. स. ६००–६३० ) हा सर्वांत श्रेष्ठ आणि प्रतापी होता. त्याच्या अनेक पदव्यांपैकी ‘चेट्टकरी’ किंवा ‘मंदिरे बांधणारा’ ही एक पदवी होती. त्याने प्रथम जैन धर्माची दीक्षा घेतली होती, असे म्हणतात; पण अप्पार नावाच्या एका शैव संताच्या उपदेशाने आणि प्रभावाने त्याने शैव पंथ स्वीकारला. नंतर तो शैव पंथाचा इतका कट्टा पुरस्कर्ता झाला की त्या भरात त्याने एक जैन मठ उद्ध्वस्त केला. शिव-विष्णू देवतांची त्याने अनेक मंदिरे बांधली.

गिरिगव्हरात खोदकाम करूनही अनेक देवळे बांधली. संस्कृतमध्ये प्रसिद्ध असलेले ' मतविलास प्रहसन ' हे पहिला महेंद्रवर्मा या राजाने रचले. महेंद्रवर्मा राजाचा पिता राजा सिंहविष्णू याच्या पदरी किरातार्जुनीयाचा प्रसिद्ध लेखक प्रथितयश संस्कृत कवी भारवी हा राजकवी म्हणून होता. महेंद्रवर्म्याचा मुलगा नृसिंहवर्मा ( इ. स. ६३० ते ६६८ ) याने मद्रासजवळील सुप्रसिद्ध ' महाबलिपुरम् ' या ठिकाणी दगडातून कोरलेली सात मंदिरे बांधली. ती प्रेक्षणीय आहेत. या राजाच्या कारकीर्दीत चीनचा सुप्रसिद्ध प्रवासी ह्यूएनत्संग या ठिकाणी भेट देऊन गेला.


नृसिंहवर्मा दुसरा ( इ. स. ६९५–७२२ ) या राजाने कांची येथील कैलासनाथमंदिर आणि समुद्रकिनारी ' महाबलिपुरम् ' ही मंदिरेबांधली. संस्कृत महाकवी व ग्रंथकार दंडी हा नृसिंहवर्मा या राजाच्या कारकीर्दीत प्रसिद्धीस आला. वैष्णवपंथीय राजा नंदीवरम् दुसरा ( इ. स. ७३० ते ८०० ) याने मुक्तेश्वर मंदिर आणि कांचीचे सुप्रसिद्ध वैकुंठ पेरूमल मंदिर बांधले. तिरुमलाई आळवार हा या राजाच्या कारकीर्दीत भरभराटीस आला.

सातव्या शतकात प्रसिद्धीस आलेल्या ज्ञानसंबुद्ध याने रचिलेल्या काव्यात एकाम्बरनाथ अथवा ' तिरुकाच्ची-एकांबन ' या मंदिराचा उल्लेख आढळतो. हे मंदिर विशाल असून त्याच्या प्राकारात अनेक दैवते आणि तीर्थे आहेत. महाद्वारावरचे गोपुर १८८ फूट उंच असून त्याला दहा मजले आहेत. दक्षिण भारतात पंचतत्त्वांचे प्रतीक अशी पाच शिवलिंगे सुप्रसिद्ध आहेत. पृथ्वीतत्त्वाचे प्रतीक म्हणून

७१३५२ २ ४५/८
३५८ १७-२-८८



कांचीचे एकांबरनाथ शिवलिंग सुप्रसिद्ध आहे. या शिवलिंगास क्षितिलिंग म्हणतात. हे लिंग वाळूचे बनलेले असल्यामुळे या लिंगावर अभिषेक होत नाही. त्याला



एकांबरेश्वर मंदिर, शिवकांची

चमेलीचे अत्तर लावले म्हणजे स्नान झाले असे मानतात. 'आप 'तत्त्वाचे प्रतीक असलेले शिवलिंग जंबुकेश्वरी आहे. अग्नितत्त्वाचे प्रतीक तिरुवन्नमलै या ठिकाणी आहे. वायुतत्त्वाचे प्रतीक कालाहस्ती येथे आहे आणि आकाशतत्त्वाचे प्रतीक चिदंबरम् येथे आहे.

ब्रह्माण्ड पुराणात अशी कथा दिली आहे : शिव आणि गौरी एकदा फासे खेळत असताना एकमेकांशी भांडले.


गौरीने शिवाचा उपमर्द केला. शिवाने गौरीला कुरूप होशील असा शाप दिला. मग तिने कांची येथील एका आम्रवृक्षाखाली वाळूचे शिवलिंग स्थापन केले आणि तेथे तप करून तिने पुन: शिवास प्रसन्न करून घेतले. शिवाच्या कृपेने तिची कुरूपता नष्ट झाली आणि ती कामाक्षी किंवा मदनाक्षी म्हणजे सुंदर नेत्रांची देवता झाली. तिची भक्ती कशी आहे, त्याची कसोटी शिवाने घेतली. गौरी ज्या ठिकाणी वाळूचे शिवलिंग स्थापून शिवपूजा करण्यात मग्न झाली, त्या ठिकाणी शिवाने गंगेचा प्रचंड ओघ सोडला. गंगेच्या प्रचंड ओघाने गौरी भयभीत झाली. पण तिने आपल्या प्राणांची पर्वा न करता शिवमूर्तीचे रक्षण केले. शिव प्रसन्न झाले. पार्वतीपरमेश्वरांची भेट झाली. गौरीने मग त्याची अशी प्रार्थना केली: या एकाकी आम्रवृक्षाखाली आपण सतत वास्तव्य करावे. शिवाने ती अट मान्य केली म्हणून या आम्रवृक्षाला एकाम्रनाथ, एकांबरनाथ किंवा एकांबन अशी नावे आहेत.

नावाप्रमाणे या देवालयाजवळ एक आम्रवृक्ष आहे. या आम्रवृक्षाखाली शिव प्रथम गौरीपुढे प्रकट झाला. कांची शहराच्या पश्चिमेस वेगवती नदी वाहते. तिला कांबी अशी एक संज्ञा आहे. यापासून एकांवन हे नाव या ठिकाणाला प्राप्त झाले असे मानतात.

या देवालयाच्या एका बाजूला कामाक्षी देवतेचे एक मंदिर आहे. शिवाच्या अवकृपेने गौरी एकदा कुरूप झाली होती, ती या ठिकाणी पुन: पूर्ववत होऊन तिने 'कामाक्षी' असे स्वरूप धारण केले. येथे यंत्र ह्या प्रतीकाने देवीची

पूजा केली जाते. इतर ठिकाणांप्रमाणे हे चक्र देवीच्या मूर्तीखाली न ठेवता मूर्तीपुढे ठेवले जाते.

आठव्या शतकात झालेले आद्य शंकराचार्य हे या कामकोटी अंबिकेचे महान उपासक आणि भक्त होते. येथे पुढील दंतकथा सांगतात. कामाक्षी देवी कालीचे स्वरूप घेऊन सर्व देशभर रात्री संचार करते आणि ज्या भागात दैवी कोप झाला असेल किंवा अनाचार घडले



एकाम्रनाथ मंदिराजवळील आम्रवृक्ष

असतील तेथे वावरते. तेथे महाभयंकर उत्पात आणि अपघात होत राहतात. आद्य शंकराचार्यांनी देवीची आराधना करून तिचा कोप शांत केला आणि आपल्या परवानगीशिवाय देवीने मंदिरातून कोठेही हलू नये, असे तिच्याकडून वचन घेतले. त्यांच्या अपूर्व भक्तीने संतुष्ट

होऊन देवीमातेने त्यांची प्रार्थना ऐकली आणि हे वचन पाळण्याचे कबूल केले.

कामाक्षी मंदिरात शंकराचार्यांचा पुतळा आहे. जेव्हा मंदिरातून देवीची मिरवणूक निघते आणि शहरात मिरवत जाते त्या प्रत्येक प्रसंगी शंकराचार्यांच्या या मूर्तीपुढे मिरवणूक थांबते, परवानगी मिळविते आणि पुढे जाते, अशी प्रथा आहे. आणि ती आजमितीसही प्रचलित आहे.

शंकराचार्यांचे दक्षिणेतील एक स्थान 'कामकोटी पीठ' कांची या शहरी स्थापन झाले. ते पहिल्याने विष्णु-कांचीस होते; पण नंतर विष्णु-कांचीस रामानुजाचार्यांचे अनुयायी जसे वाढत गेले, तसे ते शिवकांचीस नेण्यात आले. हे कामकोटी पीठ इ. स. १७४३ मध्ये कांचीहून कुंभकोणम् येथे हलविण्यात आले.

हल्लीचे मठाधिपती हे परंपरेतले ६८ वे शंकराचार्य आहेत. स्कंद पुराणातील शिवरहस्यात ग्रथित केल्याप्रमाणे कामकोटी पीठ हे आद्य शंकराचार्यांचे मध्यवर्ती मुख्य ठिकाण मानले जाते. आद्य शंकराचार्यांनी आपल्या योग-सामर्थ्याने कामकोटी येथील देवतेची 'उग्र कला' आत्म-सात केली आणि ती एका चक्रात समाविष्ट करून त्या चक्राची स्थापना पीठात केली होती. या चक्राला 'काम-कोटी चक्र' असे नाव असून त्याची रोज पूजा केली जाते.

कांची येथे असलेल्या दुसऱ्या प्राचीन मंदिराचे नाव राजसिंहेश्वर. हे पल्लवराज राजसिंह याने इ. स. ६८७ च्या सुमारास बांधले. नंतर पश्चिमेकडील सुप्रसिद्ध

चालुक्यवंशीय राजा विक्रमादित्य याने या पल्लवांच्या राज्यावर स्वारी केली. त्या वेळी या मंदिरात पुष्कळ सुधारणा केली.

शिवकांची येथे अशी अनेक शिवमंदिरे आहेत. कोष्टी लोकांची जेथे वसाहत आहे. तेथे ' भेराळी ' मंदिर बांधलेले आहे. या मंदिराचा उल्लेख संत अप्पार (इ. स. ६००-६८१) याने केला आहे. सर्वतीर्थ या नावाने प्रसिद्ध असलेले एक सरोवर या ठिकाणी असून त्या सरोवराच्या मधोमध व भोवताली असंख्य शिवलिंगे आहेत.

शिवकांचीहून सुमारे दोन मैलांवर विष्णुकांची वसले असून या ठिकाणी भगवान विष्णूची अनेक मंदिरे आढळतात. त्या सर्वांत प्रमुख आणि महत्त्वाचे मंदिर वरदराजाचे मंदिर होय. ते एका टेकडीवर उंच ठिकाणी बांधलेले आहे. त्या देवालयावर अनेक ठिकाणी खोदलेल्या शिल्पाकृती आणि शिलालेख आहेत. विजयनगरचे राजे यांच्याकडून या देवालयास उदार राजाश्रय होता. या देवालयाच्या पूजेअर्चेसाठी अनेक गावे दिली होती. याप्रमाणे रत्नखचित दागिने, पूजेची इतर सर्व उपकरणी उपलब्ध करून दिली होती.


पल्लव राजघराण्यातील महान राजा परमेश्वर याने असेच एक दुसरे देवालय बांधले. त्याचे नाव वैकुंठ पेरूमल देवालय. या देवालयाचे मूळचे नाव परमेश्वर वीणानगरम् होय. ऐतिहासिक दृष्टया या देवालयाचे फार महत्त्व आहे. पल्लवकालीन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना या देवालयावर आज दृष्टीस पडतो. या देवालयावरील शिल्पकलेत

भिंतीवरून आणि आजूबाजूच्या कानाकोपऱ्यांतून विष्णूच्या निरनिराळ्या अवतारांच्या स्वरूप दृष्टीस पडते. या वैकुंठ पेरूमल देवालयाच्या भोवताली, खांबावरून आणि भिंतीवरून पल्लव राजवंशातील नंदीवर्मन राजाच्या कारकीर्दीतील महत्त्वपूर्ण प्रसंग खोदलेले आढळतात. या देवालयाच्या वरच्या तिसऱ्या मजल्यावर एक सुवर्णाची पाल तयार करून ती वरच्या छताला टांगली आहे, तिला भक्तगण स्पर्श करून जात असतात. या स्पर्शानंतर पालीच्या स्पर्शाचा दोष किंवा बाधा उत्पन्न होत नाही अशी समजूत आहे.

अशी कित्येक विष्णुमंदिरे विष्णुकांची येथे आहेत. यांपैकी काही मंदिरे विजयनगरचे सम्राट कृष्णदेवराय ( इ. स. १५०९ ते १५३० ) यांनी बांधली आहेत. लोकांच्या मनात पावित्र्य आणि भक्ती या भावना दृढ व्हाव्यात या उद्देशाने ही भव्य मंदिरे बांधण्यात आली. तत्कालीन इतिहासाचे प्रतिबिंबही येथील शिलालेखावरून आढळून येते.

सहाव्या शतकापैकी काही वर्षे सोडली तर प्राचीन काळापासून नवव्या शतकाच्या मध्यापर्यंत कांची हे पल्लव राजांच्या राजधानीचे शहर होते. नंतर हे शहर चोलवंशीय राजाच्या ताब्यात गेले. ते जवळजवळ तेराव्या शतकापर्यंत होते. मध्यंतरी ते ९४५ ते ९७० या काळात राष्ट्रकुल राजांच्या ताब्यात होते. नंतर काही कालापर्यंत वरंगळ घराण्यातील काकतीय व मदुराई येथील पांड्य राजांच्या ताब्यात गेले. विजयनगर राजघराण्याच्या

ताब्यात ते चौदाव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत होते. त्या काळानंतर मोगल साम्राज्य व मराठेशाहीच्या ताब्यात हे शहर होते. शेवटी क्लाईव्हने ते इ. स. १७५३ साली ब्रिटिश राज्याला जोडले.



विष्णुकांची

वामन पुराणात असे लिहिले की, फुलात सर्वोत्तम फूल जाईचे, तसे शहरात शहर कांचीचे. कंबाई अगर वेगवती नदीच्या किनारी वसलेले कांची शहर हे प्राचीन काळी समृद्ध होते. त्यात भव्य प्रासाद, उंच उंच तटबंदी किल्ले, रुंद रुंद रस्ते आणि खोल खंदक व विहिरी होत्या.

शिवाचे आणि विष्णूचे एकाच ठिकाणी एवढ्या मोठ्या

प्रमाणात वास्तव्य हे भारतात कांची या शहरातच आहे!

शिव काय किंवा विष्णू काय दोघेही सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे अवतार. हरिहरांत भेद नाही, असे संत महंत आजवर सांगत आले आहेत. पण कित्येक वेळा आत्यंत्तिक प्रेमाने व भक्तीने हे स्वरूप पालटते आणि भक्तगण आपआपल्या इष्ट देवतेला एकमेव श्रेष्ठ असे मानीत असतो. या प्रेमातिरेकाने शिवकांची येथील शिवभक्त व विष्णुकांची येथील विष्णुभक्त एकमेकांचा मत्सर करू लागले. दोन देव शेजारी, पण भक्तगणात वितुष्ट भारी, असे झाले. उभे गंध व आडवे गंध, पूजेचे प्रकार, बेल व तुळस हे पूजासाहित्य भांडणाचे मूळ ठरू लागले. शिवकांचीचे लोक विष्णुकांचीत पाऊल घालीनात व विष्णुकांचीचे भक्त शिवकांचीत येईनात. कालान्तराने आणि शिक्षणप्रसाराने हे हास्यास्पद प्रकार कमी होत आहेत.

वरदराजाच्या गुणवर्णनपर ब्रह्माण्ड पुराणातील हा श्लोक पाहा.

**नमोऽस्तु ते पंकजपत्रलोचन**
**प्रसीद मह्यं प्रणतार्तिभंजन ।**
**दृष्ट्वा भवन्तं वरदं वरेण्यम्**
**अद्य प्रपन्नोऽस्मि तवाङ्घ्रियुग्मम् ॥**

२१३४२
३८८

# ३ : चित्रकूट

राम, सीता आणि लक्ष्मण अयोध्येहून वनवासाला निघाले. महर्षी वाल्मीकींच्या आश्रमात ते गेले, तेव्हा वनवासात श्रीरामाने आपला आश्रम कोठे बांधावा, यासंबंधी त्यांनी विचारविनिमय केला.

वाल्मीकी म्हणाले, " रघुवीरा, तू प्रथम चित्रकूट पर्वतावर आपला आश्रम बांध. कारण ते स्थळ अत्यंत सुंदर असून पवित्र आहे. त्या स्थळी पुराणप्रसिद्ध अशी मंदाकिनी नदी वाहते. जवळ अत्री ऋषींचा आश्रम आहे. चित्रकूटाच्या परिसरात वन्य श्वापदे वैर विसरून एकत्र राहतात. योगाचा अभ्यास करणाऱ्या ऋषिमुनींचे ते एकान्त स्थळ आहे. तेथे तुझा आश्रम बांध आणि विश्रांती घे. तुझ्या निवासामुळे चित्रकूटाचा महिमा वाढेल. त्या श्रेष्ठ चित्रकूटाचा परिसर तुझ्या आश्रमामुळे उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांचे एक महान सांस्कृतिक केंद्र बनेल ! "

चित्रकूटाचे वर्णन करताना महर्षी भरद्वाज श्रीरामाला म्हणाले, " रामा, येथून दहा कोसांवर एक पर्वत आहे,

त्याचे नाव चित्रकूट ! तेथे तू वास्तव्य कर ! तो पर्वत तुला खूपच आवडेल. कारण त्या पर्वतावर अनेक ऋषिमुनींनी वास्तव्य केले आहे. त्या पुण्य पर्वताचे दर्शन शुभकारक आहे. गोलांगूल नावाचे वानर तेथे संचार करीत असतात. त्या पर्वताच्या शिखरदर्शनाने मनुष्याच्या मनात सद्विचार येतात. भगवान शंकरासह सर्व देवता त्या पर्वतावर क्रीडा करण्यासाठी येत असतात !

कंद, मुळे, फळे आणि मध यांची त्या ठिकाणी विपुलता आहे. नाना प्रकारचे वृक्ष, हत्ती, मयूर वगैरे प्राणी, जलप्रवाहांनी युक्त अशा दऱ्या, गुहा तेथे आहेत. तो प्रदेश सीतेला अत्यंत रमणीय वाटेल.


त्या पर्वतावर तू आनंदाने राहा. मनसोक्त संचार करून तुझ्या वास्तव्यात त्या पुण्यपर्वताला तू धन्य कर ! "

महर्षी वाल्मीकी आणि भरद्वाज यांच्या सांगण्याप्रमाणे राम, सीता आणि लक्ष्मण चित्रकूट पर्वताकडे गेले. त्यांनी प्रथम मंदाकिनी नदीत स्नाने केली आणि चंद्रकोरीच्या आकाराने वाहणाऱ्या पयस्विनी नदीच्या सुंदर तटाकावर विश्रांती घेतली.

नंतर चित्रकूटावर योग्य जागा शोधून त्यांनी पर्णकुटी बांधली. विंध्य पर्वताच्या एका फाटयावर अगदी स्वतंत्र असा हा चित्रकूट पर्वत टेकडीसारखा आहे. त्यावर सुंदर आश्रम त्यांनी बांधला. लक्ष्मणासाठी रात्रीचे विश्रांतिस्थान म्हणून चित्रकूटाच्या समोरील एका लहान स्वतंत्र टेकडीवर त्यांनी एक आणखी छोटी पर्णकुटी बांधली.

आश्रमासाठी चित्रकूटाची ही जागा प्रभू रामचंद्राला

फारच आवडली. या रम्य स्थळापासून दक्षिणेकडील दंडकारण्यात जाण्याची पूर्वतयारी करणे आणि आपल्या



पर्णकुटी, चित्रकूट

पश्चात अयोध्येतील वार्ता कळणे, ह्या दोन्ही गोष्टी साधणे सहजसुलभ होते. त्या दृष्टीने चित्रकूट स्थान रामाला महत्त्वाचे वाटले.

राम, सीता आणि लक्ष्मण यांना वनवासातून परत अयोध्येला नेण्यासाठी भरत आणि पौरजन चित्रकूटावर आले. त्यांचा तो लवाजमा लक्ष्मणाने उंच टेकडीवरून पाहिला. त्याला वाटले की भरताने श्रीरामाला मारण्यासाठी सैन्यच आणले आहे. म्हणून लक्ष्मणाने आपले

धनुष्य सज्ज केले. पण श्रीरामाने त्याची समजूत घालून त्याला आवरले.

नंतर श्रीरामाची आणि भरताची अपूर्व भेट झाली. त्यांचे बंधुप्रेम पाहून सर्वांना आनंद झाला. भरताने रामाला अयोध्येला चलण्याचा खूप आग्रह केला. पण राम म्हणाले, "भरता, वडिलांच्या वचनपूर्तीसाठी मला चौदा वर्षे वनातच राहणे योग्य आहे ! तू अयोध्येचे राज्य कर !"

पण भरत काही ऐकेना. शेवटी त्याने रामाच्या पादुका घेतल्या. त्या अयोध्येला नेऊन सिंहासनावर ठेवल्या आणि आपण श्रीरामाचा प्रतिनिधी म्हणून राज्य चालवू लागला.


त्या भरतभेटीच्या सोहळ्याची आठवण म्हणून अद्यापही चित्रकूटावर त्यांच्या पावलांच्या खुणा दाखविल्या जातात. तुलसीदास लिहितात :

**"चित्रकूट मुनिथल तीरथ बन**
**खग मृग सर सरी निर्झर गिरिगन ।**
**प्रभुपद अंकित अवनि विशेषी**
**आयसु होय तौ आवहुं देखी ।।"**

श्रीराम प्रभूच्या पदस्पर्शाने पावन झालेली चित्रकूट परिसरातील ती भूमी ! पदयात्रा करून तिची परिक्रमा करावी म्हणून भरताने इच्छा प्रदर्शित केली.

तेव्हा श्रीराम म्हणाले, "अत्री ऋषींच्या आज्ञेने तू या भूमीची निर्भयपणे परिक्रमा कर !" मग भरताने मंदाकिनी व पयस्विनी नदीत स्नाने केली. अत्री मुनींचे दर्शन घेतले आणि त्या चित्रकूट ब्रह्मपुरीची पदयात्रा पाच दिवस केली.

त्या चित्रकूट ब्रह्मपुरीच्या परिसरात धनुष्याकृती अशा तीस यज्ञवेदी होत्या. त्या यज्ञभूमीवरील भस्म त्याने आपल्या अंगावर धारण केले. कामदा-चित्रकूट गिरि-राजाच्या भोवतालच्या पंचक्रोशीत सर्व तीर्थांचे निवास आहेत. त्या सर्व तीर्थदर्शनाने सर्व पापे नष्ट होतात. त्या तेहतीस तीर्थांसह चित्रकूटाची यात्रा भरताने प्रथमच केली.



मंदाकिनीवरील घाट, चित्रकूट

श्रीरामाने दशरथ राजाची उत्तरक्रिया ज्या मंदाकिनी नदीवर केली त्या ठिकाणी यात्रेकरू प्रथम स्नान करून पितरांना पिंडदान करतात. नंतर श्रीरामाच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या चित्रकूट पर्वताभोवती पाच कोस पदयात्रा करून प्रदक्षिणा पूर्ण करतात.

चित्रकूटावर अद्यापही श्रीरामाचे वास्तव्य आहे अशी समजूत असल्यामुळे कोणीही यात्रेकरू त्या पर्वताच्या शिखरावर चढत नाही. फक्त तो त्या टेकडीच्या भोवताली पायात जोडे न घालता अनवाणी प्रदक्षिणा करतो. या प्रदक्षिणेच्या मार्गात कोठे वालुकामय भाग, तर कोठे कंटकमय प्रदेश आहे. परंतु एकंदरीत तो भाग सृष्टि-सौंदर्याने युक्त असून मार्गात अनेक देवदेवतांची देवळे आणि श्रीरामाची स्मृतिस्थळे आहेत. त्यांच्या दर्शनाने प्रत्येक यात्रेकरूला प्रसन्नता आणि समाधान लाभते.

चित्रकूटाला एक प्रदक्षिणा घातली तर भारतातील सर्व तीर्थांची यात्रा केल्याचे पुण्य मिळते, असे या रामाश्रमाचे महत्त्व वर्णन केले आहे !

चित्रकूटाची परिक्रमा करताना सामान्यतः पुढीलप्रमाणे यात्रा करण्याचा प्रघात पाळला जातो.

पहिल्या दिवशी राघवप्रयाग या ठिकाणी स्नान करून कामदागिरिराजाची प्रदक्षिणा करायची. नंतर सीतापूर येथे मुक्काम करायचा.

दुसऱ्या दिवशी राघवप्रयागावरून कोटितीर्थ यात्रेला जायचे, तेथे सीतेचा संसार आणि हनुमानधारा या स्थळांचे दर्शन घेऊन परत सीतापुर येथे मुक्काम करायचा.

तिसऱ्या दिवशी राघवप्रयागच्या संगमघाटावर स्नान करून रामधाम, केशवगड, प्रमोदवन, जानकीकुंड, सिरसावन, स्फटिकशिळा, आणि अनसूया या तीर्थस्थळांचे दर्शन घेऊन बाबूपुरात मुक्काम करायचा.

चौथ्या दिवशी बाबूपुराहून गुप्तगोदावरी तीर्थात स्नान करून कैलासपर्वताचे दर्शन घ्यायचे आणि चौबेपुरात मुक्काम करायचा.

पाचव्या दिवशी चौबेपुराहून भरतकूपावर जाऊन तेथे स्नान करायचे. नंतर रामशय्या वगैरे ठिकाणांची दर्शने घेऊन परत सीतापूर येथे यायचे !

पाच दिवसांच्या या पदयात्रेत या ठिकाणाशिवाय पुष्करणी, शरभंग, मार्कण्डेय, वाल्मीकिआश्रम वगैरे अनेक पवित्र स्थळे लागतात, तेथे स्नाने आणि दर्शने करून यात्रेकरू धन्य होतात.

चित्रकूटाच्या यात्रेतील महत्त्वाच्या स्थळांविषयी काहींची माहिती पुढे दिली आहे.

**सीतापूर** — पयोष्णी नदीच्या डाव्या तीरावर हा छोटासा सुंदर गाव आहे. या जागी श्रीरामाने पर्णकुटी बांधून निवास केला होता. या गावाजवळ पयस्विनी नदीवर चोवीस घाट बांधलेले आहेत. त्यांपैकी राघव-प्रयागघाट, कैलासघाट, रामघाट, मंदाकिनीघाट वगैरे घाट मोठे असून प्रसिद्ध आहेत. हे सर्व घाट, नदीतटाक, त्यांवरील मंदिरे आणि सृष्टिशोभा अत्यंत प्रेक्षणीय आहे. या गावाला पुरी असेही म्हणतात. या गावी बहुतेक वस्ती पंड्ये लोकांची आहे. मोठमोठ्या धर्मशाळांतून यात्रेकरूंच्या उतरण्याची छान सोय आहे. या गावाजवळच कामदा गिरिराज हा पर्वतप्रदेश आहे.

**राघवप्रयाग**—सीतापुराजवळच पयोष्णी नदीला चंद्र-कोरीच्या आकाराची मंदाकिनी नदी मिळते. त्याच

ठिकाणी गुप्तगायत्री नावाची तिसरी नदीही मिळते. याच पवित्र त्रिवेणी संगमावर प्रभु रामचंद्राने प्रथम आपल्या पित्याची उत्तरक्रिया केली होती. म्हणून या पवित्र स्थळाला राघवप्रयाग असे नाव मिळाले.

येथील घाटावर मत्तगजेंद्रेश्वर महादेवाचे सुंदर मंदिर आहे. हे मंदिर पन्ना संस्थानचे राजे अमानसिंह यांनी बांधले. रामाच्या वेळी या ठिकाणी मजगंद नावाच्या राजाचे राज्य होते. त्या राजाच्याच परवानगीने श्रीरामाने या स्थळी निवास केला होता. त्या मजगंद राजाच्या स्मरणार्थ हे मंदिर बांधले आहे.

राघवप्रयागघाट आणि मंदाकिनी घाट यांच्यामध्ये त्रिवेणी संगमात रामघाट आहे. त्यावर यज्ञवेदी आहे. प्राचीन काळी या ठिकाणी ब्रह्मदेवाने यज्ञ केला होता.

राघवप्रयागजवळच श्रीरामाची पर्णकुटीही आहे. तिला लोक परमकुटी असेही म्हणतात. चित्रकूट क्षेत्रात राघव-प्रयाग हे तीर्थ अत्यंत श्रेष्ठ समजले जाते.

**तुलसीदासपर्णकुटी** — हिंदी रामायणकर्ते संतकवी तुलसीदास यांनी चित्रकूट येथे त्यांचा आश्रम बांधला होता. रामघाटावर त्यांचा निवास होता त्या वेळी त्यांना तेथे प्रत्यक्ष प्रभु रामचंद्रांची भेट झाली, असे त्यांनी स्वतःच लिहून ठेवले आहे.

" चित्रकूट के घाटपर भइ सन्तनकी भीर
तुलसीदास चंदन घिसै, तिलक देत रघुवीर ! "

तुलसीदासांची दुसरी पर्णकुटी कामदागिरिराजाजवळ चरणपादुकांजवळ आहे. तेथे सध्या त्यांची मूर्ती बसविलेली

आहे. तुलसीदासांच्या निवासामुळे चित्रकूटची भूमी पावन झाली आहे.



तुलसीदासपर्णकुटी, चित्रकूट

तुलसीदासांच्या पर्णकुटीजवळच मंदाकिनीच्या तटी जानकीकुंड नावाचे एक पवित्र तीर्थस्थान आहे. त्या तीर्थात मध्यभागी पांढऱ्या शिळेवर रामसीतांच्या पावलांची चिन्हे आहेत. हा भाग सृष्टिसौंदर्याने सतत बहरलेला असतो.

पर्वतावरून येणारा एक लहानसा झरा या पर्णकुटी-जवळच्या हनुमान मंदिरासमोरील एका कुंडात येऊन पडतो. त्याला हनुमानधारा किंवा पाताळगंगा असे म्हणतात. ही धारा अत्यंत पवित्र मानतात. हनुमान धारेच्या पाण्याने स्नान केले असता कुष्ठ वगैरे रोग नष्ट होतात, आणि

प्रमोदवनांतील पुत्रीवृक्षाला प्रदक्षिणा घातल्याने वंध्येलाही पुत्रप्राप्ती होते असे सांगतात. हनुमानधारेच्या जवळच उंच पर्वतभागात सीतेचा संसार आहे. तेथे एका खोलीत त्याची मांडणी केलेली आहे. ते सीतेचे स्वयंपाकघर पाहून भाविक भक्त आदराने भारावून जातात. मंदाकिनीच्या पात्रात एक मोठी सुंदर स्फटिक शिळा आहे. ती राम-जानकींची बैठकीची जागा असे मानतात. तिचे दर्शन घेणे हा चित्रकूट यात्रेतील एक महत्त्वाचा भाग मानतात.

**कामदागिरिराज** — चित्रकूट यात्रेच्या कार्यक्रमात या थोर पवित्र गिरिराजाची प्रदक्षिणा करणे महत्त्वाचे असते. हा पर्वतभाग म्हणजे श्रीरामचंद्राचे जणू सिंहासनच आहे असे म्हणतात. या पवित्र गिरिराजावर अद्यापही प्रभूंचा निवास आहे असे मानून याची प्रदक्षिणा करणे हे थोर पुण्याईचे कार्य प्रत्येक यात्रेकरू करतो. छत्रसाल राजाची राणी चांदकुवर हिने प्रथम या गिरिराजाच्या प्रदक्षिणेचा मार्ग चांगला करविला. नंतर सरकारने तो रस्ता पक्का सीमेंटचा केला. या पर्वतराजावरील वृक्ष कोणीही तोडीत नाहीत. त्यामुळे तो भाग सदैव हिरवागार राहतो. या प्रदक्षिणेमुळे सर्वांना प्रसन्नता लाभते.

**अनसूया**—कामदागिरिराजापासून सुमारे बारा किलो-मीटर अंतरावर अत्रिऋषींचा आश्रम आहे. तेथे अत्री, अनसूया, दत्तात्रेय आणि रामचंद्र यांच्या सुंदर मूर्ती आहेत. जाण्यास पायऱ्या असून आश्रमाजवळच उतरण्याच्या सोयीच्या धर्मशाळा आहेत. सती अनसूयेने याच ठिकाणी सीतेला उपदेश केला. अक्षय्य ओली राहणारी चंदनाची

उटी दिली होती. त्या उटीचे महत्त्व विशेष होते :

" उष्णा उटी हिमी ती, उष्णी ही सर्वकाळ परम हिमा "

अशी ती उटी होती. सीतेला तिचा फार उपयोग झाला. या ठिकाणी सीता जणू माहेरीच राहत होती. तिच्या अनेक स्मृती या ठिकाणी अद्यापही आहेत. सीतापुराहून कामदागिरीकडे जाताना वाटेत मुखारविंद नावाची एक गुहा लागते. त्या ठिकाणी राम आणि जानकी यांनी काही काळ निवास केला होता असे सांगतात. त्या ठिकाणी रामाची पदचिन्हे दाखवितात. स्फटिकशिळा, जानकीकुंड, चरणपादुका वगैरे अनेक ठिकाणी श्रीरामाच्या पदचिन्हांचे दर्शन घेऊन यात्रेकरू धन्य होतात.

**भरतकूप**—प्रभू रामचंद्राला अयोध्येला परत नेण्यासाठी भरत लव्याजम्यासह आला होता. त्या वेळी त्याने श्रीरामाला चित्रकूटावरच राज्याभिषेक करण्याची तयारी केली होती. राज्याभिषेकाचे सर्व सामान त्याने बरोबरच आणले होते. अनेक पवित्र तीर्थांचे कुंभही त्याने भरून आणले होते. पण रामचंद्राने त्या गोष्टीला मान्यता दिली नाही. भेटीनंतर भरत परत चालला तेव्हा त्याने अत्रिऋषींच्या सांगण्यावरून सर्व तीर्थांनी भरलेले कुंभ एका विहिरीत सोडले. त्या पवित्र पाण्याची विहीर म्हणजेच सध्याचा भरतकूप होय ! या कूपाजवळच भरताचे सुंदर मंदिर बांधलेले आहे. प्रत्येक यात्रेकरू या भरतकूपाच्या पवित्र जलाने स्नान करून राजर्षी भरताच्या मूर्तीचे दर्शन घेतो; आणि मगच चित्रकूट यात्रा संपवितो.

# ४ : अयोध्या


**अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ।**
**पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ।।**

प्रभू रामचंद्राच्या जन्माने आणि राज्याने धन्य झालेली अयोध्या नगरी सप्तपुऱ्यांपैकी आद्य म्हणून गौरविण्यात आली आहे.

अयोध्या हे ठिकाण दिल्ली-अलाहाबाद रेल्वे वाटेवर फैजाबादेहून सुमारे सहा किलोमीटर्स अंतरावर आहे. उत्तर कोसल प्रदेशातील सूर्य वंशातील राजांची ही राजधानी म्हणून प्राचीन काळी प्रसिद्ध होती. सूर्यवंशातील राजांनी या ठिकाणी अनेक वर्षे राज्य केले. प्रभू रामचंद्रांचा अवतार याच वंशात झाला. अयोध्यापती राम हा राज्य करीत असताना येथील प्रजा सुखी होती.

इसवी सनाच्या पूर्वी सुमारे एकतीसशे वर्षांपूर्वी भारताचा नृपती मनू याने अयोध्या नगरीची स्थापना केली. मनूच्या नऊ मुलांपैकी इक्ष्वाकू हा ज्येष्ठ पुत्र, त्याला मध्यदेशाचे राज्य मनूने दिले. इक्ष्वाकूचा ज्येष्ठ पुत्र विकुक्षी हा नंतर राज्यावर आला. विकुक्षीचा मुलगा

परंजय ह्यालाच ‘ककुत्स्थ’ अशी बहुमानाची पदवी प्राप्त झाली होती. असुरांबरोबर सामना करण्यासाठी इंद्राने वृषभाचे रूप घेऊन आपल्या खांद्यावरून त्याला वाहून नेले होते अशी कथा आहे.



शरयू नदीवरील घाट, अयोध्या

मनूनंतर त्याच्या वंशात वीस पिढ्या उलटून गेल्यावर त्याच्या वंशात चक्रवर्ती सम्राट मांधाता हा राज्य करू लागला. त्याच्या जन्मकाळी इंद्राने आपला अंगठा त्याला ( अमृतपानासाठी ) चोखण्यासाठी दिला. म्हणून त्याचे नाव मांधाता ( माम् धाता – मला चोखणारा ) असे पडले. त्याने शंभर अश्वमेध व एक राजसूय यज्ञ

केला. हा राजा प्रजेवर पुत्राप्रमाणे प्रेम करीत असे. तो महान मातृभक्तही होता. आमच्या राजवंशातील राजे ऋषिप्रणीत आचार, विचार व धर्मपालन करतात. रघुकुलाची रीत अशी चालत आलेली असून ती अखंड आहे, असे हा राजर्षी म्हणत असे.

अयोध्या हे शहर शरयू नदीकाठी वसलेले आहे. ही नदी कुमायू पर्वतातून उगम पावली असून पुढे तिला काली नदी मिळते. तिला पुढे अयोध्या प्रांतात घाग्रा अगर गोग्रा असे नाव प्राप्त झाले. ऋग्वेदात शरयू नदीचा सिंधू, सरस्वती या नद्यांबरोबर उल्लेख केलेला आढळतो. एकवीस नद्यांना प्रतिभावान स्फूर्तिदात्या माता असे संबोधून त्यांना आवाहन केलेले आहे. त्यांचे जल हे दूध, मध आणि लोणी यांप्रमाणे मधुर असते, असे वर्णन केले आहे.

विश्वामित्राच्या प्रखर कसोटीला पूर्णपणे उतरलेला सत्यप्रिय सम्राट राजा हरिश्चंद्र हा मांधात्याचा वंशज होता. राजा हरिश्चंद्रानंतर अयोध्येचे गेलेले वैभव त्याच्या वंशातील राजा सगर याने पुनः मिळविले.

सगराच्या पुत्रांनी कपिल ऋषींचा अपमान केला. कपिल ऋषींनी त्यांना शाप दिला. त्यामुळे जळून जाऊन राखेचे ढीग होऊन पडले. त्यांच्या वंशात पुढे भगीरथ हा महाप्रतापी राजा झाला. आपल्या पूर्वजांना या शापातून मुक्त करण्यासाठी त्याने तपश्चर्या केली आणि गंगेला स्वर्गातून आणि हिमालयातून खाली आणले. त्याच वंशात पुढे दिलीप, रघू यांसारखे श्रेष्ठ राजे झाले. रघुराजाने विश्वजित यज्ञ करून सर्व संपत्ती दान करून टाकली. त्या

735.2 दि: 12 4417
3cc

नंतर त्या वंशात ‘ अज ’ आणि ‘ दशरथ ’ राजे जन्मले.

दशरथाने पुत्रकामेष्टी केला. या यज्ञात त्याला ऋष्यशृंगाचे सहाय्य झाले. यज्ञसमाप्तीनंतर दशरथाला चार पुत्र लाभले. त्यांची नावे राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न. श्रीराम हा मनूपासून पासष्टावा वंशज. तो आदर्श राजा मानला जाई.

प्रभू रामचंद्र अयोध्येच्या राज्यावर होते, तेव्हा तर अयोध्येचा उत्कर्ष मोठ्या प्रमाणावर झाला होता. त्या काळच्या अयोध्येचे वर्णन वाल्मीकीने असे केले आहे :

**कपाटतोरणवतीं सुविभक्तान्तरापणाम्**
**सर्वयंत्रायुधवतीमुषितां सर्वशिल्पिभिः ।।**
**सूतमागधसम्बाधां श्रीमतीमतुलप्रभाम् ।**
**उच्चाट्टालध्वजवतीं शतघ्नीशतसङ्कुलाम् ।।**

(वाल्मीकि रामायण १. ५. १०–११)

(द्वारे आणि तोरणे यांनी युक्त, आंतल्या बाजारपेठांची मांडणी व्यवस्थित आणि विभक्त असलेली, सर्व यंत्रे आणि आयुधे यांनी युक्त, सर्व प्रकारचे कारागीर जिच्यामध्ये राहतात अशी, सूत व मागध यांनी भरलेली, ऐश्वर्यवती, जिची प्रभा अतुलनीय आहे, जिच्यामध्ये उंच हवेल्या आणि ध्वज फडकत आहेत आणि जिच्यामध्ये शेकडो तोफा आहेत, अशी ती अयोध्या होती.)

रामाने आपले राज्य आपल्या मुलांना व पुतण्यांना वाटून दिले. रामाचा पुत्र कुश हा अयोध्यापती झाला. लवाला उत्तर कोशल राज्य दिले. श्रावस्ती ही या राज्याची राजधानी. भरताचे पुत्र तक्ष आणि पुष्कर यांची तक्षशीला आणि गांधार प्रांती पुष्करावती येथे स्थापना केली.

शत्रुघ्नाचे पुत्र शूरसेन आणि सुबाहू यांची अनुक्रमे मथुरा आणि विदिशा येथे स्थापना केली, लक्ष्मणाच्या मुलांना हिमालयाच्या भागात राज्य दिले.

श्रीरामाच्या नंतर तीस पिढ्या उलटल्यावर महाभारतीय युद्ध झाले. ( ख्रिस्ताब्दपूर्व सुमारे १४०० वर्षे) त्या वेळी अयोध्या येथे बृहद्रथ राजा राज्य करीत होता.

अयोध्या हे जैन पंथियांचेही महापवित्र स्थान आहे. चोवीस तीर्थंकरातील पहिला तीर्थंकर आदिनाथ म्हणजेच ऋषभदेव हा इक्ष्वाकू वंशातील असून तो नाभी राजाचा पुत्र होता. दुसरे एकवीस तीर्थंकरही इक्ष्वाकू वंशातील होते. अयोध्या ही ऋषभदेवाची जन्मभूमी. अजित, अभिनंदन, सुमती, अनंत आणि अचल यांचा जन्मही ह्याच ठिकाणी झाला; अयोध्येजवळील अष्टावन पर्वतावर आदिनाथ यांना साक्षात्कार झाला.

बुद्धकाळी अयोध्या शहराचे महत्त्व फारसे कमी झालेले नव्हते. फा-हिएन आणि ह्यूएन-त्संग या दोन्ही प्रवाशांनी अयोध्येला भेट दिली होती. त्यांनी आपल्या प्रवासवर्णनात अयोध्येचा उल्लेख केला आहे. ह्यूएन-त्संग म्हणतो, " असांग आणि वसुबंधू हे तेथे राहत होते. या काळी त्या ठिकाणी वीस बौद्धमठ असून महायान आणि हिनायनपंथी तीस हजार विद्यार्थी विद्या शिकण्यास मठात राहत असत."

स्कंद पुराणात वर्णन केल्याप्रमाणे अयोध्या हे विष्णूचे (म्हणजे श्रीरामाचे) स्थान. ते मत्स्याकाराचे आहे. येथे नागेश्वर नावाचे एक मंदिर आहे. बागेत दर्शनेश्वर मंदिर

व शहरात हनुमान गढी आहे. या ठिकाणी असंख्य वानरे संचार करीत असतात.

अयोध्या हे पवित्र क्षेत्र पौराणिक व ऐतिहासिक कालापासून हिंदूंचे, तसेच जैन पंथियांचेही पवित्र स्थान असे मानले गेले आहे. सप्तपुऱ्यांमध्ये अयोध्येचे स्थान पहिले आहे. सूर्यवंशीय राजघराणी, इक्ष्वाकू वंशातील प्रभू रामचंद्र, रुक्मांगद असे सहा सम्राट राजे, राजा विक्रमादित्य वगैरे महान चक्रवर्ती राजे येथे होऊन गेले.

अयोध्येशी विक्रमादित्याचा संबंध कसा आला ही कथा मनोरंजक व उद्‌बोधक आहे. उज्जयिनीचा राजा विक्रमादित्य राज्य करीत असता एके समयी त्याला रामकृपेने अशी स्फूर्ती झाली की रामजन्म ज्या ठिकाणी झाला ते अयोध्येतील ठिकाण शोधून तेथे मंदिर बांधावे. तो अयोध्येत आला खरा, पण प्रभू रामरायाचे जन्माचे ठिकाण त्याला सापडेना. तो शरयू नदीच्या काठी जाऊन विचार करीत बसला. इतक्यात तेथे काळ्या रंगाचा पोशाख करून काळ्या घोड्यावर बसून एक दिव्य पुरुष आला. कुंडात स्नान करून तो वर येतो तो त्याचा व त्याच्या घोड्याच्या शरीराचा रंग बदलून त्यांची कांती कापरासारखी धवल झाली. हा कोणी दिव्य पुरुष असावा. त्यालाच रामजन्म-स्थान विचारावे असे योजून विक्रम राजा त्याला म्हणाला, "भगवन् कृपा करून श्रीरामचंद्राची जन्मभूमी कुठे आहे ते मला सांगा."


तो दिव्य पुरुष म्हणाला, "राजा तुझी भक्ती पाहून मला आनंद झाला. पण मला आता थांबता येत नाही.

तुझ्या प्रश्नाचे उत्तर तुला काशी क्षेत्री राजा विश्वनाथाचे दरबारी मिळेल. मी तीर्थराज प्रयाग आहे. जगाची पापे नाहीशी करण्यासाठी मला या निर्मली कुंडात रोज येऊन स्नान करावे लागते," असे बोलून तो दिव्य पुरुष तेथून अदृश्य झाला.

वरील संदेशानुसार राजा विक्रम काशीक्षेत्री गेला. तेथे त्याने काशी विश्वेश्वराचे दर्शन घेऊन अनन्य भावे प्रार्थना केली व आपला मनोरथ स्पष्ट केला. शिवनामाचा उच्चार करीत तो तेथे धरणे धरून बसला. काशी विश्वेश्वर प्रसन्न होऊन म्हणाला, "ही घे एक पोथी आणि ही कामधेनू. तू आता अयोध्येस जा. शरयू नदीच्या काठी ही कामधेनू चरू लागेल. तू तिच्या मागोमाग जा. ही धेनू चरता चरता जेथे पान्हवेल व तिच्या स्तनांतून ज्या ठिकाणी दूध गळू लागेल ती जागा रामचंद्राच्या जन्मस्थानाची. त्या ठिकाणी मंदिर बांधून तू अयोध्या नगरीची पुनर्रचना कर. तुझे मनोरथ पूर्ण होतील." एवढे बोलून विश्वेश्वर तेथे अंतर्धान पावले.

त्यानंतर राजाने गाय आणि पोथी घेतली. तो अयोध्येला गेला. कामधेनू चरण्यास निघाली. तिच्या मागोमाग विक्रमादित्य हिंडू लागला. मग एके ठिकाणी ती थांबली व तेथेच तिच्या स्तनांतून दुधाच्या धारा वाहू लागल्या. हेच ते पवित्र जन्मस्थान असे ठरवून राजाने त्या भूमीची विधियुक्त पूजा केली. देशोदेशीचे विद्वान वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण व पंडित यांना बोलावून राजाने आपला नगरपुनर्रचनेचा आणि जन्मस्थानी मंदिर

बांधण्याचा मनोरथ व्यक्त केला. पंडितांनी सर्व अयोध्येची सीमा, सर्व तीर्थस्थाने यांचा पत्ता लावून दिला. मग विक्रमादित्याने अगणित संपत्ती खर्च करून अयोध्येस प्रथम पाच मंदिरे बांधली व प्रभू रामरायाच्या मूर्तीची स्थापना केली.



कनकभवन, अयोध्या

पहिले मंदिर : जन्मस्थान – हे ठिकाण गोमातेच्या स्तनातून जेथे दुग्धधारा स्रवू लागल्या ते निश्चित करून तेथे रामपंचायतनाच्या मूर्तीची स्थापना केली. तेथे एक राममंदिरही बांधले. दुसरे मंदिर म्हणजे रत्नसिंहासन. या ठिकाणी श्रीरामचंद्राला राज्याभिषेक झाला. तेथे

पट्टाभिषिक्त रामसीता यांच्या मूर्ती स्थापन केल्या. तिसरे मंदिर कनकभवन – रामजानकींचे विहारस्थान. तेथे रामजानकींच्या मूर्ती स्थापन केल्या.


चौथे मंदिर सहस्रधारा तीर्थावर आहे. तेथे लक्ष्मणाची मूर्ती स्थापन केली आहे. पाचवे मंदिर आदिशक्तीच्या स्थानावर बांधले आहे. येथे एका भव्य शिलेवर महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती आदि शक्तियंत्रासहित स्थापन केल्या आहेत. या स्थानास देवकाली असे म्हणतात.

राजा विक्रमाने अयोध्या नगरीत मंदिरे स्थापन केली. मंदिरांच्या पूजेअर्चेची व्यवस्था लावली. गोब्राह्मणांना संतुष्ट केले व नंतर तो कृतार्थ होऊन उज्जयिनीस गेला. तेव्हापासून या पाच मंदिरांची प्रसिद्धी झाली.

नंतरच्या काळात इ. स. ११९३ मध्ये शहाबुद्दिन घोरी याने अयोध्या प्रांत जिंकला. अयोध्येवर मुसलमानांचे राज्य आले. त्यांनी आपल्या कारकीर्दीत मंदिरे उद्ध्वस्त केली. देवस्थाने, तीर्थस्थळे भ्रष्ट केली. तेथील ब्राह्मण अगतिक झाले. जन्मभूमी मंदीर व कनकभवन येथील मूर्तींना धक्का लागू नये म्हणून तेथील पुजाऱ्यांनी त्या शरयू नदीत लपवून ठेवल्या. पुढे इ. स. १८५६ ते १९४७ या काळात अयोध्येवर इंग्रजांची सत्ता होती.

कालान्तराने जन्मस्थानाची शरयू नदीतील मूर्ती नरसिंहराव नावाच्या ब्राह्मणास दृष्टान्तात दिसली. त्या वेळचे महाराज दर्शनसिंह यांनी मग त्या मूर्तीची स्वर्गद्वार तीर्थावर नागेश्वर मंदिराजवळ स्थापना केली. हे स्थान 'कालेरामजी' या नावाने प्रसिद्ध आहे. मुसलमानी

आक्रमणाची भीती कमी झाल्यावर रत्नसिंहासन मंदिरातील मूर्ती पुजाऱ्यांनी पुन्हा मंदिरात आणून त्यांची स्थापना



श्रीराममंदिर, अयोध्या

केली. विक्रमाने बांधलेले पूर्वीचे राममंदिर उद्धस्त करून औरंगजेब बादशहाने तेथे मशीद बांधली. हल्ली जे मंदिर आहे ते अहल्याबाई होळकर यांनी बांधलेले आहे.

अयोध्येच्या परिसरात पूर्वी अनेक मंदिरे, तीर्थे, सरोवरे होती. उदाहरणार्थ – निर्मली कुंड, सप्तसागरतीर्थ, सहस्त्रधारातीर्थ, दुर्गाकुंड, सूर्यकुंड, वसिष्ठकुंड, मनोरमातीर्थ, चक्रतीर्थ, अग्नितीर्थ, सीताकूपतीर्थ, स्वर्गद्वारतीर्थ, नागेश्वर-

मंदिर, कालेरामजी मंदिर, हनुमानगढी मंदिर इत्यादी. प्रभू रामरायांनी हनुमानाला अयोध्येत कायमचे वास्तव्य करावे, असे सांगितले होते. या ठिकाणी महारुद्र हनुमान आजपावेतो बसलेले आहेत, अशी भाविकांची श्रद्धा आहे. वर उल्लेख केलेल्या पाच मंदिरांशिवाय त्रेतारामंदिर, रामकोट, रामघाट, मणीपर्वत, लक्ष्मणमंदिर, राजवाडा वगैरे ठिकाणे आहेत. नंदीग्राम हे ठिकाण अयोध्येच्या दक्षिणेस सुमारे तेवीस किलोमीटरवर आहे. रामाच्या पादुका स्थापन करून आणि या ठिकाणी राहून भरत अयोध्येचे राज्य चालवीत असे व स्वतः रामनामात मग्न असे. या ठिकाणीच राम आणि भरत यांची लंकेहून अयोध्येला परत येण्यापूर्वी प्रथम भेट झाली. या ठिकाणी भरतकुंड आणि भरताची गुहा म्हणजे तपश्चर्येची जागा आहे.

अयोध्येतील राममंदिरात चैत्र शुद्ध पक्षात रामनवरात्र-महोत्सव, श्रावण महिन्यात शुद्ध तृतीयेपासून चतुर्दशी-पर्यंत आणि कार्तिकात उत्सव साजरे करतात. मंदिरात सतत भजन चालू असते. एकंदर वातावरण रामनामाच्या गजराने दुमदुमत राहते.

श्रीरामजन्मस्थान या ठिकाणी आजमितीस काही वास्तू ठिकाणावर नाही. सर्व प्रासादांचा संपूर्ण नाश झाला आहे.

अयोध्येच्या महाराजांनी बांधलेले संगमेश्वराचे देऊळ सुंदर आणि टुमदार आहे.

अयोध्येतील सगळी मंदिरे दुपारी अकरा वाजल्यानंतर बंद होतात. दुपारी तीन–चार वाजता उघडतात. नंतर

पुन: ती रात्रौ दहा वाजता बंद होतात. यात्रेकरूंच्या सोयीसाठी या ठिकाणी 'अयोध्यातीर्थ सुधार समिती' आहे. तेथे यात्रेकरूंना जरूर ती मदत व माहिती मिळते. येथे हिंदूंच्या आणि जैनांच्या अनेक धर्मशाळा आहेत. हिंदूंप्रमाणे जैनांचेही हे तीर्थक्षेत्र असल्यामुळे हिंदू आणि जैन यात्रेकरू येथे दरसाल दर्शनास येतात.

जैनांच्या पहिल्या आणि चौथ्या तीर्थंकरांचे अयोध्या हे जन्मस्थान आहे. जैन राजा ऋषभ याने येथे एक विद्यापीठ स्थापन केले होते.

बौद्ध धर्माच्या इमारतींचे अनेक भग्नावशेष अयोध्या प्रांतात आढळतात. मणीपर्वत व रामटेक यांवर बौद्धांचे स्तूप आढळतात.

अयोध्या हे नाव उच्चारताच सर्व रामायण मन:चक्षूंपुढे उभे राहते. या पवित्र शरयू नदीच्या किनारी प्रभू रामचंद्र, सूर्यवंशातील सम्राट, राजेरजवाडे, वसिष्ट, वाल्मीकी ऋषी, अयोध्येचे नागरिक वावरत होते. कितीतरी काळपर्यंत 'रामराज्य' अनुभवीत होते. आधुनिक काळात संत तुळसीदासांसारखे अनेक संतमहंत, अयोध्यानिवासी प्रभू रामरायाचे गुणगान करण्यात स्वत:ला धन्य समजत होते.

मंदिर, कालेरामजी मंदिर, हनुमानगढी मंदिर इत्यादी. प्रभू रामरायांनी हनुमानाला अयोध्येत कायमचे वास्तव्य करावे, असे सांगितले होते. या ठिकाणी महारुद्र हनुमान आजपावेतो बसलेले आहेत, अशी भाविकांची श्रद्धा आहे. वर उल्लेख केलेल्या पाच मंदिरांशिवाय त्रेतामंदिर, रामकोट, रामघाट, मणीपर्वत, लक्ष्मणमंदिर, राजवाडा वगैरे ठिकाणे आहेत. नंदीग्राम हे ठिकाण अयोध्येच्या दक्षिणेस सुमारे तेवीस किलोमीटरवर आहे. रामाच्या पादुका स्थापन करून आणि या ठिकाणी राहून भरत अयोध्येचे राज्य चालवीत असे व स्वतः रामनामात मग्न असे. या ठिकाणीच राम आणि भरत यांची लंकेहून अयोध्येला परत येण्यापूर्वी प्रथम भेट झाली. या ठिकाणी भरतकुंड आणि भरताची गुहा म्हणजे तपश्चर्येची जागा आहे.

अयोध्येतील राममंदिरात चैत्र शुद्ध पक्षात रामनवरात्र-महोत्सव, श्रावण महिन्यात शुद्ध तृतीयेपासून चतुर्दशी-पर्यंत आणि कार्तिकात उत्सव साजरे करतात. मंदिरात सतत भजन चालू असते. एकंदर वातावरण रामनामाच्या गजराने दुमदुमत राहते.

श्रीरामजन्मस्थान या ठिकाणी आजमितीस काही वास्तू ठिकाणावर नाही. सर्व प्रासादांचा संपूर्ण नाश झाला आहे.

अयोध्येच्या महाराजांनी बांधलेले संगमेश्वराचे देऊळ सुंदर आणि टुमदार आहे.

अयोध्येतील सगळी मंदिरे दुपारी अकरा वाजल्यानंतर बंद होतात. दुपारी तीन–चार वाजता उघडतात. नंतर

पुन: ती रात्रौ दहा वाजता बंद होतात. यात्रेकरूंच्या सोयीसाठी या ठिकाणी 'अयोध्यातीर्थ सुधार समिती' आहे. तेथे यात्रेकरूंना जरूर ती मदत व माहिती मिळते. येथे हिंदूंच्या आणि जैनांच्या अनेक धर्मशाळा आहेत. हिंदूंप्रमाणे जैनांचेही हे तीर्थक्षेत्र असल्यामुळे हिंदू आणि जैन यात्रेकरू येथे दरसाल दर्शनास येतात.

जैनांच्या पहिल्या आणि चौथ्या तीर्थंकरांचे अयोध्या हे जन्मस्थान आहे. जैन राजा ऋषभ याने येथे एक विद्यापीठ स्थापन केले होते.

बौद्ध धर्माच्या इमारतींचे अनेक भग्नावशेष अयोध्या प्रांतात आढळतात. मणीपर्वत व रामटेक यांवर बौद्धांचे स्तूप आढळतात.

अयोध्या हे नाव उच्चारताच सर्व रामायण मन:चक्षूंपुढे उभे राहते. या पवित्र शरयू नदीच्या किनारी प्रभू रामचंद्र, सूर्यवंशातील सम्राट, राजेरजवाडे, वसिष्ट, वाल्मीकी ऋषी, अयोध्येचे नागरिक वावरत होते. कितीतरी काळपर्यंत 'रामराज्य' अनुभवीत होते. आधुनिक काळात संत तुळसीदासांसारखे अनेक संतमहंत, अयोध्यानिवासी प्रभू रामरायाचे गुणगान करण्यात स्वत:ला धन्य समजत होते.

# ५ : गया

" ऊठ गयासुरा, वत्सा, तुझं कल्याण असो ! " हे शब्द प्रत्यक्ष भगवान श्रीशंकरांनी उच्चारले. पण तो गयासुर ध्यानचिंतनात इतका मग्न झालेला होता की त्याला ते शब्द ऐकू सुद्धा आले नाहीत !

गयासुर तपश्चर्येला बसला होता. त्याच्या डोक्यावर पक्षी बसले होते. त्याच्या अंगाखांद्यांवर मोठमोठे सर्प खेळत होते. त्याच्या सभोवती वाघ, सिंह इत्यादी हिंस्र पशू बसले होते. गयासुराच्या मुखातून " ॐ नमः शिवाय " या पंचाक्षरी मंत्राचा अखंड जयघोष चालला होता. त्या मंत्रघोषाने तेथील वृक्षपाषाण मंत्रमुग्ध झाले होते. सारा आसमंत त्या नादनिनादाने दुमदुमून गेला होता.

गयासुराच्या त्या खडतर तपश्चर्येमुळे कैलास डळमळू लागले. भगवान शंकर गयासुराकडे धावत आले आणि त्याला वर देण्यासाठी आतुर झाले. पण गयासुराची समाधी भंगली नाही.

शेवटी शंकरांनी आपला डमरू वाजविला, शंख फुंकला आणि गयासुराला मोठ्याने हाक मारली, " ऊठ, गयासुरा

स्थळप्रत

ऊठ! वत्सा, तुझं कल्याण असो!"

गयासुराने डोळे उघडले. प्रत्यक्ष भगवान श्रीशंकर आपल्यासमोर उभे आहेत हे पाहून त्याला आनंद झाला. तो ताडकन उठला, त्याने श्रीशंकराचे पाय धरले आणि आपल्या अश्रूंचा अभिषेक त्यांच्या चरणकमलांवर केला.

श्रीकैलासनाथाने गयासुराच्या मस्तकावर हात ठेवला आणि ते त्याला गंभीर वाणीने म्हणाले, "वत्सा, तुझं कल्याण असो! तुझ्या या घोर तपश्चर्येनं मी प्रसन्न झालो आहे. वर माग! काय इच्छा असेल ते मागून घे!"

"महादेवा, या अवनीतलावरील दीन दरिद्री लोकांचं कल्याण व्हावं हीच माझी इच्छा आहे! त्या बिचाऱ्यांना यज्ञयाग करण्याचं सामर्थ्य नाही. जपतप, नेमधर्म वगैरे कर्म करून मोक्ष मिळविण्याइतकी त्यांना शक्ती नाही. तेव्हा अशा लोकांचा उद्धार होऊन त्यांना मोक्षाची प्राप्ती सहज व्हावी असा काही सोपा उपाय सांगा. केवळ माझ्या कृपाकटाक्षानं सर्व जनतेला मोक्ष मिळावा. अशी दिव्य शक्ती माझ्या दृष्टीत यावी. बस! यापेक्षा मला दुसरं काही नको! लोकांच्या कल्याणानं माझं समाधान व्हावं!" गयासुराने मागणी केली.

गयासुराची ती विलक्षण मागणी ऐकून शंकरांना आश्चर्य वाटले आणि अत्यंत आनंदही झाला. असुर म्हणजे राक्षस! त्याची मागणी म्हणजे आसुरीच असायची. पृथ्वीचे साम्राज्य. स्वर्गाची सत्ता. अमरपद. अशा प्रकारे उतूनमातून वर येण्याचीच मागणी ती असायची! पण गयासुराने तर लोककल्याणार्थ दिव्य

दृष्टीची मागणी केली. केवळ परोपकारासाठी आपल्या देहाचे सार्थक करणारी मागणी त्याने केली. त्यामुळे भगवान शंकर प्रसन्न झाले. ते त्याला म्हणाले, "तथास्तु ! गयासुरा, तुझ्या म्हणण्याप्रमाणं होईल ! तुझ्या दिव्य दृष्टिक्षेपाने पापी लोकही उद्धरून जातील !"

गयासुराला श्रीशंकराचे वरदान लाभले. तो फल्गू नदीच्या काठी आश्रम बांधून राहू लागला. त्याच्याकडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे तो आपल्या दिव्य कृपादृष्टीने पाहू लागला. त्यामुळे त्या त्या सर्व मानवांची पातके नष्ट होऊन ते पुण्यात्मे बनू लागले; आणि शेवटी त्यांना मोक्षप्राप्ती होऊ लागली.

हां हां म्हणता ही वार्ता सर्वत्र पसरली. मग दूरदूरच्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी गयासुराकडे येऊन मोक्ष मिळवू लागल्या. गयासुराचे महत्त्व खूपच वाढले.

भारतातील सर्व लोकांची पापे गयासुराच्या कृपादृष्टीने नाहीशी होऊ लागली. त्यामुळे यमलोक ओस पडू लागला. चित्रगुप्ताला चिंता लागली. स्वर्गात गर्दी झाली. नरकात शुकशुकाट झाला. यमराज बेचैन झाले !

एके दिवशी यमधर्म ब्रह्मदेवाकडे गेले. ब्रह्मदेवसुद्धा काळजीतच बसले होते. कारण सगळे लोक गयासुराच्या कृपेने मोक्ष मिळवीत होते. जन्ममरणाच्या फेऱ्यात कोणीच सापडत नव्हता. तेव्हा ब्रह्मदेवाचे पुनर्जन्म देण्याचे काम बंद पडले होते.

ब्रह्मदेव आणि यम हे दोघेही समदुःखी होते त्यांनी एकमेकांना आपली चिंता सांगितली. मग दोघांनी विचार

केला आणि ते वैकुंठाला भगवान श्रीविष्णूकडे गेले. त्यांनी विष्णूला आपले गाऱ्हाणे सांगितले. तेव्हा विष्णू म्हणाले, "आता त्या परोपकारी गयासुराला आपण युक्तीनेच मोक्ष दिला पाहिजे. तो गेला तरच पृथ्वीवरील लोक आपल्या मोक्षासाठी यज्ञयाग, व्रतं, दानं, जपतप वगैरे पुण्यकर्मे करू लागतील !" ब्रह्मदेव, यम व विष्णू या तिघांनी थोडा विचार केला. नंतर त्यांनी कर्मठ ब्राह्मणांची रूपे घेतली आणि ते थेट गयासुराकडे गेले.

**देव :** परोपकारी गयासुराचं कल्याण असो !

**गयासुर :** वेदशास्त्रसंपन्न ब्रह्मवृंदांचं स्वागत असो !

**देव** : आमचा हेतु गयासुराकडून सफल होवो !

**गयासुर :** महाराजांनी आसनस्थ व्हावं ! क्षणभर शांत बसावं. म्हणजे दृष्टिक्षेपानं आपणाला मोक्षप्राप्ती सुलभ होईल. आपली इच्छा पूर्ण होईल !

**देव :** छे छे गयासुरा, आमची ती इच्छा नाही !

**गयासुर :** मग आपल्या आगमनाचा हेतु स्पष्ट व्हावा.

**देव :** यज्ञयागावर आमचा विश्वास आहे. आम्हांला तुझ्या दृष्टिक्षेपानं सहज मिळणारा मोक्ष नको ! आम्ही एक मोठा यज्ञ करणार आहोत. पण त्यात एक अडचण आहे !

**गयासुर :** ठीक आहे. जशी आपली इच्छा! त्याबाबतची आपली कोणती अडचण मी दूर करू ?

**देव :** यज्ञासाठी आम्हांला तुझ्या या फल्गुक्षेत्रात एखादी अत्यंत शुद्ध अशी जागा पाहिजे !

**गयासुर** : एवढेच ना ? चला मी तशी योग्य जागा देतो. हा पाहा नदीकाठ. हा सरोवराचा परिसर. हे उपवन.

यापैकी कुठंही आपण आपला यज्ञसमारंभ करावा !

**देव** : छे छे गयासुरा, यांपैकी एकही जागा शुद्ध नाही. तुझे पुण्यपावन शरीर हीच एक पवित्र जागा आमच्या यज्ञाला योग्य आहे.

**गयासुर** : वाहवा ! ही छान कल्पना. महाराज माझ्या पाठीवर आपण यज्ञ करा. आणि माझे शरीर कृतार्थ होऊ द्या.


अशा प्रकारे गयासुराची अनुमती मिळाल्यावर त्या तिघांनी गयासुराच्या पाठीवर यज्ञकुंड पेटविले. सहा महिने तो यज्ञ चालला. गयासुराची पाठ यज्ञाच्या अग्नीमुळे भाजून निघाली. ते सारे सहन करून त्याने त्या थोर ब्राह्मणांचा यज्ञ समारंभ चालूच ठेवला.

शेवटी नऊ महिन्यानंतर पूर्णाहुतीच्या वेळी गयासुर म्हणाला, " विप्रहो, आता माझ्या पंचप्राणाची पूर्णाहुती या तुमच्या यज्ञात होऊ द्या ! माझा हा देह ब्रह्मार्पण होऊ द्या ! मला आता मुक्ती मिळू द्या ! "

श्रीविष्णू, ब्रह्मदेव आणि यमधर्म यांनी गयासुराला आपल्या खऱ्या रूपाचे दर्शन दिले. ते तिघेही त्याच्यावर प्रसन्न झाले. त्यांची ती दिव्य रूपे पाहून तो गयासुर धन्य झाला. त्याने डोळे मिटले आणि तो त्यांच्या स्वरूपी विलीन झाला. त्याला मुक्ती मिळाली.

यमधर्माने एक भली मोठी शिळा घेतली. ती गयासुराच्या भव्य मस्तकावर ठेवली. त्या शिळेवर शंखचक्रगदाधारी श्रीविष्णूने आपला एक पाय ठेवला आणि गयासुराला त्याने वर दिला. भगवान विष्णू म्हणाले,

"धन्य तो गयासुर ! याची आठवण म्हणून आजपासून हे क्षेत्र 'गयाक्षेत्र' या नावाने प्रसिद्ध होईल आणि 'गया-गदाधर' या दिव्य स्वरूपात मी येथे कायमचा वास करीन ! या शिळेवरील विष्णुपदावर जे लोक पिंडदान करतील त्यांच्या पितरांचा उद्धार होईल. त्यांना मुक्ती मिळेल !"



गदाधर, गया

तेव्हापासून भारतातील हे प्रसिद्ध गयाक्षेत्र त्रिस्थळी यात्रेतील एक अत्यंत पवित्र असे तीर्थक्षेत्र बनले. लाखो यात्रेकरू येथे येऊन विष्णुपदावर पिंडदान करतात आणि आपल्या पितरांचा उद्धार करतात. गयागदाधर देवाचे भव्य सुंदर मंदिरातील शीळेवर ते प्रख्यात विष्णूपद आहे. आणि परोपकारी गयासुराचे हे पवित्र गयाक्षेत्र फल्गू नदीच्या पंचक्रोशीत आहे.

**पंचक्रोशं गयाक्षेत्रं क्रोशमेकं गया शिरः ।**
**यत्र यत्र स्मरेन्नित्यं पितृणां दत्तमक्षयं ।।**

**मगधेषु गया पुण्या नदी पुण्या पुनः पुनः ।**
**च्यवनस्थाश्रमः पुण्यः पुण्यं राजगृहं स्मृतं ।।**

गयाक्षेत्राला विष्णुगया किंवा पितृगया म्हणतात. येथे येणारा प्रत्येक यात्रेकरू—

**गदाधरं, विष्णुपदं अष्टादश पदानपि ।**
**वंदे अक्षयवटं फल्गुं लक्ष्मीं गौरीं गयेश्वरीं ।।**

या क्रमाने दर्शन घेतो. गयाक्षेत्राच्या परिसरात गया-गज, गयादित्य, गायत्री, गदाधर, गया आणि गयाशिर अशा सहा गया मोक्षदायक अशा आहेत. गयाक्षेत्र हेच श्राद्धासाठी श्रेष्ठ क्षेत्र मानले जाते. इतर ठिकाणी श्राद्ध करायचे असेल तर प्रथम या गयेचे स्मरण केलेच पाहिजे असे शास्त्र आहे.

**कुरुक्षेत्रं गयां गंगां प्रभासं पुष्करं तथा ।**
**एतानि पुण्यतीर्थानि श्राद्धकाले सदा पठेत् ।**

असे आहे गयेचे महत्व! विष्णुपदावर केलेले पिंडदान अत्यंत श्रेष्ठ असते. येथे एकदा पिंडदान केले म्हणजे पुन: पिंडदान न करता नुसते ब्रह्मार्पणच करायचे असा रिवाज पडला आहे.

गया येथे यात्रेकरूंना अनेक ठिकाणी श्राद्धे करावी लागतात. पण त्यांपैकी तीन ठिकाणची श्राद्धे महत्त्वाची मानतात. एक फल्गू नदीवर, दुसरे विष्णुपदावर आणि तिसरे अक्षय्यवटाचे ठिकाणी !

फल्गू नदीच्या दोन्ही तीरांवर गया शहराची वस्ती आहे. विष्णुपदक्षेत्राची गया ती जुनी गया आणि दुसऱ्या तीरावरील साहेबगंजाचा भाग आहे ती नवी गया असे म्हणतात.

फल्गू नदीच्या पात्रात सर्वत्र वाळूच आहे. मध्यभागी पाण्याचा अगदी थोडासाच प्रवाह आहे. पण पात्रातील वाळू उकरली तर खालच्या बाजूला खूपच पाणी लागते.

म्हणजे फल्गूचा खरा प्रवाह वाळूच्या खालून वाहत आहे हे स्पष्ट दिसते.



फल्गू नदीवरील घाट, गया

फल्गू नदी पाण्याने धो धो वाहत होती तेव्हाची द्वापार युगातील गोष्ट. एकदा सीता, राम आणि लक्ष्मण फिरता फिरता फल्गू नदीच्या तीरावर आले. त्या वेळी रामाला एकदम आठवण झाली की आज आपल्या वडिलांच्या पुण्यतिथीचा— श्राद्धाचा दिवस आहे. तेव्हा श्राद्धासाठी सामग्री आणायला रामाने लक्ष्मणाला जवळ गावात पाठविले. त्याला परत यायला बराच वेळ लागला, हे पाहून राम स्वतः त्याला शोधायला गेले. परंतु तेवढ्यात माध्यान्ह काळ झाला आणि श्राद्धाचा वेळ टळून जाऊ लागला.

तेव्हा सीतेने स्नान केले आणि जी काही सामग्री होती ती घेऊन रामाच्या ऐवजी तिने स्वतःच पितरांना पिंडदान केले. त्यामुळे रामाचे पूर्वज संतुष्ट झाले आणि हात लांब करून नदीप्रवाहातून पिंड घेऊन ते जाऊ लागले. तशी सीता त्यांना म्हणाली, "श्रेष्ठ पूर्वजांनो, आज आपण समक्ष येऊन पिंड घेऊन गेलात, याबद्दल मला धन्यता वाटते. पण ही गोष्ट माझ्या पतीला खरी कशी वाटणार? मी त्यांची खात्री कशी करून देऊ?"


सीतामाईचा प्रश्न कानी पडताच आकाशवाणी झाली, "हे सीते, इथे घडलेली गोष्ट रामाला खरी वाटावी म्हणून तू कुणाला तरी साक्षी ठेव! म्हणजे तुझी काळजी दूर होईल." म्हणून सीतेने फल्गू नदी, गाय, अग्नी आणि केवडा या चौघांना साक्षी ठेवले.

थोडा वेळ गेला आणि राम आणि लक्ष्मण श्राद्धाची सामग्री घेऊन परत आले. पिंड करण्यासाठी त्यांनी सीतेला भात टाकायला सांगितले.

त्यावर सीतेने घडलेली सारी हकीकत सांगितली. राम आणि लक्ष्मण यांना ते खरे वाटेना. तेव्हा सीता म्हणाली, "फल्गू नदी, गाय, अग्नी आणि केवडा हे साक्षी आहेत. आपण त्यांना विचारावे म्हणजे आपली शंका नाहीशी होईल." परंतु आश्चर्याची गोष्ट! सारे साक्षीदार उलटले आणि प्रत्यक्ष घडलेली आणि पाहिलेली हकीकत कोणीच सांगेना. ते सारे जण म्हणू लागले, "आम्हांला यांतलं काहीच ठाऊक नाही!"

यामुळे सीतेचा नाइलाज झाला. पिंड देण्यासाठी तिने

भात तयार केला. रामाने पिंडदानासाठी मंत्र म्हणून पितरांना आवाहन केले. तेव्हा आकाशवाणीच्या रूपाने



विष्णुपद मंदिर, गया

पितृदेव म्हणाले, "-रामा, आम्हांला पिंडदान मिळाले. तुझ्या जानकीने आम्हांला आज तृप्त केले." सीतेने केलेल्या या पिंडदानाची हकीकत सूर्याने रामाला सांगितली तेव्हा रामाची खात्री झाली.

आयत्या वेळी कानांवर हात ठेवून घात करणाऱ्या या चारही साक्षीदारांना सीतेने वेगवेगळे शाप दिले. ती म्हणाली, "फल्गू, तू यापुढे पाताळात राहशील आणि तुझा प्रवाह सदैव वाळूखालून वाहील; केवड्या, तू शंकराचा नावडता होशील; गाई, तू कितीही पवित्र असलीस तरी तुझे मुख अपवित्र समजण्यात येईल आणि अग्ने, तू सर्वभक्षक होशील!"

तेव्हापासून फल्गू नदीचा प्रवाह लुप्त झाला आणि तो वाळूखालून वाहू लागला. ही कथा शिवपुराणात आली आहे.

गया स्टेशनवर गाडी येताच भिक्षुक (पंड्ये) यात्रेकरूंची चौकशी करतात व त्यांना मार्गदर्शन करतात. गावात येण्यासाठी सायकलरिक्षांची सोय आहे. येथे महाराष्ट्रीय भिक्षुक असून ते महाराष्ट्रीय यात्रेकरूंची सर्व सोय करतात. यात्रेकरू प्रथम फल्गू नदीत स्नान करतो. नंतर घाटावरील ओवरीत प्रथम पिंडासाठी सोवळ्याने भात शिजवितो. नंतर प्रथम पहिले तेथे करतो. येथील श्राद्ध झाले म्हणजे तो आतील विष्णुपदाच्या मंदिरात जातो. या मंदिराचा सभामंडप मोठा आहे. या मंदिरात पुनः दुसरे श्राद्ध होते, व ते पिंड विष्णूपदावर अर्पण करण्यात येतात. काही वृद्ध स्त्रिया विष्णुपदावर एक हजार आठ तुळशीपत्रे वाहतात. ताजी तुळशीपत्रे विकत मिळण्याची सोय येथे असते. येथील श्राद्ध झाल्यावर शेवटचे श्राद्ध अक्षय्यवटावर होते. हा अक्षय्यवट मंदिराच्या मागच्या बाजूस आहे. तेथे वडाचे झाड असून त्या वडाच्या पायथ्याशी पिंड अर्पण करावयाचे असतात. तेथे पिंड अर्पण केल्यावर

तेथील गयावळ यात्रेकरूच्या गळ्यात पाश टाकतो व त्या गयावळ्याला दक्षिणा दिल्यावर तो " तेरे पितर सरग गये " असे म्हणतो. गयावळ्याच्या मुखातून ही घोषणा झाली म्हणजे सर्व पितरांना मोक्ष मिळतो. अशी यात्रेकरूंची भावना असल्याने त्याला परम आनंद वाटतो व ही त्रिस्थळी यात्रा पूर्ण झाल्याचे समाधान त्याच्या मुखावर विलसू लागते. यात्रेकरू आपल्याबरोबर तांब्याची विष्णुपदे विकत घेतो व घरी आणून त्याची रोज पूजा करतो. यात्रेकरू अक्षय्यवटासर श्राद्ध केल्यानंतर आपल्याला आवडत्या असणाऱ्या वस्तूचा त्याग करतो व ती वस्तू तो पुढे कधीच खात नाही.


गया येथील विष्णुपदाचे हल्लीचे मंदिर व नदीवरील घाट पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई यांनी बांधले आहेत. त्या देवळात एका ठिकाणी पुढील श्लोक लिहिला आहे.

**वंदे विष्णुं रमेशं सकलसुरगणैः सेव्मयानं समंतात्**
**सर्वाभिष्टान्ददन्तं सुरुचिरमुखं पंकजाक्षं विशालं**
**फल्गूनद्यातटस्थं सकलपितृगणान्मुक्तिभावं नमंतं**
**धर्मानर्थंच कामं सकलभुविजनान्मुक्तिमंते ददत्तम् ॥ १ ॥**

या विष्णुपदाच्या मंदिरात मध्यभागी एक मोठे अष्टपैलू कुंड आहे. त्याची कड चांदीच्या पत्र्यांनीं मढविलेली आहे. या कुंडातील शिळेवर श्रीविष्णूचे एक मोठे पदचिन्ह आहे. या पदावर लोक पिंड अर्पण करतात, दूध अर्पण करतात आणि तुळशी वाहतात.

येथे देवळांतील सभामंडपात दोन ठिकाणी वरून पाणी थेंब थेंब पण फार वावकाश पडते. खाली थेंब पडला

म्हणजे तो वाजतो व दिसतो; पण तो कोठून पडतो, हे मात्र दिसत नाही ! त्या थेंबाच्या वर समोर कोणी न्याहाळून पाहिलें; तर कोठलीच जागा ओली दिसत नाही. शिवाय हा थेंब सर्व ऋतूंत पावसाळयात सुद्धा सारखा पडत असतो. पडला की लागलीच वाळूनही जातो. वाळेपर्यंत दुसरा पडत नाही.



विष्णुपद, गया

म्हणून चिखल होत नाही. खाली दगडी फरशी आहे, तेथे थेंबाचा डाग मात्र पडला आहे. थेंब कमीजास्त होत नाहीत. आपण पाहातो न पाहातो तोच थेंब पडतो ! पाण्याचा पुरवठा कोठून होतो, हे समजत नाही. हा विलक्षण चमत्कारच आहे !

गया या ठिकाणी बायकांनाही श्राद्ध करण्याची परवानगी असते. बायकासुद्धा विष्णुपदावर पिंड अर्पण करतात. गया क्षेत्रावर विशेषत: दक्षिण भारतातील स्त्रीपुरुष यात्रेकरूंची गर्दी असते. भिक्षुक एकेका वेळेला पंचवीस यात्रेकरूंना श्राद्ध संकल्प सांगतो. याखेरीज गयाक्षेत्राच्या पंचक्रोशीत प्रेतशिला, रामतीर्थ, धर्मारण्य, वगैरे अनेक पवित्र स्थळे आहेत. यात्रेकरू येथील यात्राही विधिपूर्वक करतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रमांक ४९३५२ दि: ११.१८८९
क्रमांक ३८८ बी



**बुद्धगया**

गयेपासून सात मैलांवर बुद्धगयेचे स्थान असून ते बौद्ध धर्मीयांचे महान क्षेत्र आहे. गयेला त्यामुळे आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले आहे, चीन, जपान, सीलोन, कांबोडिया वगैरे सर्व भागांतून अनेक बौद्धधर्मीय साधक या ठिकाणी येऊन बुद्धाच्या चरणस्पर्शाने पावन झालेल्या या भमीवर धर्मसाधना करतात. जीवनाचे सार्थक झाले असे मानतात.

बुद्ध गयेस जाताना तिबेटीयनांचे मंदिर आणि थायलंड रहिवासी यांचे बुद्धमंदिर यांचे दर्शन घडते. या मंदिरांतील वातावरण अत्यंत शांत असते. तिबेटीयनांच्या मंदिरात एक धर्मचक्र आहे. ते फिरवून

**ॐ मणी पद्मोऽहं !**


हा महाभंग म्हणावयाचा असतो.

सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीची गोष्ट. वयाच्या एकोणीसाव्या वर्षी उपरती होऊन सिद्धार्थाने गृहत्याग करून संन्यासव्रत घेतले आणि तपश्चर्येसाठी तो निघून गेला. तो वैशालीस आला. राजगृह आणि गयेजवळील ठिकाणी तपासाठी जागा शोधू लागला. जवळ फल्गू नदी होती; या नदीला ‘ नैरंजन ’ नदी असे नाव होते. नदीचे पाणी स्वच्छ असून ठिकठिकाणी घाट बांधले होते. नदीवर स्नान करून सिद्धार्थ एका पिंपळाच्या झाडाखाली साधना करण्यासाठी बसला. भोवतालचा परिसर रम्य सृष्टी-सौंदर्याने नटलेला आणि शांत होता. हाच भाग तपश्चर्ये-साठी योग्य वाटून गौतमाने तेथेच तपाचरणास सुरुवात केली. हळूहळू त्याने अन्न सोडले. तो कृश झाला. शरीर नुसते

अस्थिपंजर झाले. त्याला चालण्याची शक्तीही उरली नाही ही त्याची दशा पाहून सुजाता नावाच्या एका गोपकन्येने त्याला वाटीतून खीर दिली. ती प्राशन केल्यावर त्याच्या देहात प्राण आले. अवयव टवटवीत झाले. त्याने पुन: आसन स्थिर करून निर्धाराने त्या वृक्षछायेखाली ध्यान-धारणेस सुरुवात केली. गौतमाला ज्ञान होऊ लागले. एकेका पावलाने त्याला सत्याचे ज्ञान होऊ लागले. दु:ख-मुक्ती कशी होईल, शाश्वत सुख आणि आनंद कसे लाभेल आणि कसे टिकून राहील हे त्याला अनुभवावयाचे होते. ते ज्ञान त्या वृक्षाखाली त्याला झाले म्हणून त्या वृक्षाला बोधिवृक्ष असे नाव प्राप्त झाले. अश्वत्थ किंवा पिंपळ हे त्याचे नाव पालटून त्या कालापासून आजतागायत हजारो वर्षांपासून त्या वृक्षाला बोधिवृक्ष असे नाव लाभले. जगात एखादे पावित्र्य आणि महत्त्व दुसऱ्या कोणत्याही वृक्षाला प्राप्त झाले नसेल. या वृक्षाचा इतिहास फार मोठा आहे. सम्राट अशोकाच्या कारकीर्दीत या स्थानाला फार मोठे महत्त्व प्राप्त झाले. या वृक्षाची एक फांदी सिलोनमध्ये लंकेस नेऊन तेथे लावण्यात आली.

बोधिवृक्षाजवळच सुप्रसिद्ध बुद्धमंदिर आहे. बोधिवृक्ष हाच विश्वाचा मध्यबिंदू असे बौद्ध लोक समजतात. मंदिरात बुद्धाची पद्मासन घातलेली भव्य मूर्ती आहे. त्यापुढे दीप पाजळत असतात. मंदिरात प्रवेश केला की तेथील शांत, गंभीर आणि पवित्र वातावरणाने मन प्रसन्न होते, आदराने नतमस्तक होते. धीरगंभीर बुद्धमूर्ती पाहून लोटांगण घालावेसे वाटते. बुद्धमंदिराजवळ त्याच्या माता-

पित्यांची मंदिरे आहेत. अनेक बुद्ध भिक्षू येथे येऊन दर्शन घेतात. बुद्धमंदिरात गौतमबुद्धाते दर्शन घेतल्यावर प्रदक्षिणेच्या वाटेवर मंदिराचे मागेच बोधिवृक्ष आणि



बुद्धगयेतील मंदिर

आसन आहे; साधक त्याचे भक्तिभावाने दर्शन घेत असतात. हिंदू लोक बुद्ध हा विष्णूचा अवतार मानतात. वायुपुराणात या बोधिवृक्षाची महती गायिली आहे. हा

अश्वत्थ वृक्ष ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांचे प्रतीक म्हणून वंदनीय ठरला आहे.

ज्या बोधिवृक्षाखाली बसून अडीच हजार वर्षांपूर्वी गौतम बुद्धाने मानवजातीच्या शाश्वत कल्याणासाठी, सुखासाठी दुःखावर उपाय शोधून काढला; आत्मज्ञान करून जगाला शाश्वत शांतीचा महामंत्र दिला ते हे बुद्ध-गयेचे ठिकाण! हा वृक्ष गौतमाच्या तपश्चर्येने पवित्र आत्मा धन्य झाला. ह्यूएनत्संग या चिनी प्रवाशाने ह्या बोधिवृक्षाचे असे वर्णन केले आहे: "या वृक्षाची पाने उन्हाळ्यात अथवा हिवाळ्यात झडत नाहीत. जेव्हा निर्वाणप्राप्तीचा वर्षदिवस येतो, त्या दिवशी पाने झडतात पण पुन्हा दुसऱ्याच दिवशी पूर्वीप्रमाणे ताजी सुंदर पाने फुटतात. सर्व वृक्ष बहरून जातो. टवटवी येते. प्रत्येक वर्षदिनाच्या प्रसंगी लोक या वृक्षाच्या छायेखाली जमतात; त्यावर दुधाचा अभिषेक करतात; दिवे पाजळतात, फुले वाहतात, झाडाची पाने प्रसाद म्हणून घेऊन जातात."

सम्राट अशोकाने या ठिकाणी अनेक स्मारके बांधली, मंदिरे उभारली, धर्मशाळा बांधल्या. जवळच एक स्तंभ आहे. अशोक स्तंभ म्हणून तो प्रसिद्ध आहे.

गयेला विष्णुपददर्शनासाठी व श्राद्धविधी आचरण्यासाठी येणारा प्रत्येक हिंदू बुद्धगयेला या बोधिवृक्षाच्या आणि बुद्धमंदिराच्या दर्शनास येतो. बुद्धधर्मीयांचे तर हे अत्यंत पवित्र ठिकाण! गयेला विष्णुपदामुळे जितके माहात्म्य आले, तितकेच बोधिवृक्षामुळे प्राप्त झाले. फल्गू नदीचा हा पवित्र परिसर त्यामुळे धन्य झाला आहे!

# ६ : गोकुळ वृंदावन

मथुरेच्या बंदिशाळेत श्रीकृष्णाचा जन्म झाला. त्यावेळी कंसाच्या भीतीने वसुदेवाने तो आपला बाळकृष्ण त्याच रात्री यमुना नदीपार करून गोकुळात नंदगोपाची राणी यशोदा हिच्या पलंगावर नेऊन ठेवला. त्याच गोकुळात वसुदेवाचा थोरला मुलगा बलरामही वाढत होता. बलराम आणि कृष्ण या दोन भावांचे खूपच प्रेम वाढले. त्यांच्या बाळलीलांचे कौतुक साऱ्या गोकुळाने केले.

आपला वैरी गोकुळात बाळरूपाने वाढत आहे ही वार्ता कंसाला कळाली तेव्हा त्याने आपले अनेक राक्षसीदूत पाठवून गोकुळातील साऱ्या मुलांना खूपच त्रास दिला. गोकुळातील गोपबालके कृष्णाच्या साह्यामुळे त्या दुष्ट राक्षसांना मुळीच भ्याली नाहीत.

पण कंसराजाच्या छळाला कंटाळून नंदासह सर्व गवळ्यांनी गोकुळातील वस्ती उठवून ती वृंदावन येथे नेली. त्या वस्तीमुळे वृंदावनाचे सौंदर्य आणखी वाढले.

मथुरेपासून सुमारे नऊ किलोमीटर अंतरावर हल्लीचे वृंदावन क्षेत्र आहे. या क्षेत्रात श्रीकृष्णाची अनेक सुंदर व


भव्य मंदिरे आहेत. येथील मठामंदिरांची संख्या फार मोठी आहे. यमुना नदीला या ठिकाणी बत्तीस घाट बांधलेले आहेत. घाटांनी आणि मठमंदिरांनी सुशोभित असलेले हे पवित्र कृष्णक्षेत्र हजारो यात्रेकरूंनी नित्य गजबजलेले असते. दर्शन, पूजाअर्चा, भजने आणि नृत्यगायन, स्नाने आणि प्रसादभक्षण वगैरे कार्यक्रम येथे अहर्निश चालू असतो.

वृंदावनाचा सारा परिसर उपवनांनी गच्च दाटलेला आहे. गवताची विशाल कुरणे या परिसरात मुद्दाम राखलेली आहेत. गाईगुरांच्या खिल्लारांनी हा सारा परिसर भरलेला आहे. या क्षेत्रात दूधदुभत्यांची भारी चंगळ आहे. येथील दूध, दही, खवा, लोणी आणि पेढे फार प्रसिद्ध आहेत. वृक्षवेलींनी फुललेला गोवर्धन पर्वत आणि कुरणाजंगलांनी व्यापलेला यमुना तट या गोष्टींमुळे वृंदावनाच्या सौंदर्यात विशेष भर पडलेली आहे.

श्रीकृष्णाच्या बाळपणातील अनेक लीलांची स्मृतिस्थळे वृंदावनक्षेत्रात ठायीठायी दिसून येतात. कुंजगली, मनगली वगैरे गल्ल्याबोळांची नावे, यमुनेतील कालियामर्दन डोह, गोपीवस्त्रहरणाचा यमुनेवरील चित्रहरण घाट, कुंजवनातील रासक्रीडांचे स्थान, दधिमंथनाचे रांजण, वगैरे अनेक प्रसंगांची आठवण या पवित्र स्थळी कायम ठेवलेली आहे. भाविक भक्तगण ही सारी स्मृतिस्थळे पाहून श्रीकृष्णलीलांचे स्मरण आदराने करतात.

वृंदावनक्षेत्रात गोविंददेवजी, राधावल्लभ, गोपीनाथ, जुगलकिशोर, मदनमोहन वगैरे अनेक भव्य मंदिरे आहेत.

या प्राचीन प्रख्यात मंदिराखेरीज रंगजीची मंदिरे, राधा-गोपाळ, इंद्रकिशोर, गोपीश्वर वगैरे सुंदर मंदिरेही प्रख्यात असून प्रेक्षणीय आहेत. अनेक राजेमहाराजांनी आणि



श्रीकृष्ण मंदिर, मथुरा.

भाविक धनिकांनी या सर्व मंदिरांना मोठमोठ्या देणग्या देऊन त्यांचे सौंदर्य वाढविले आहे.


भव्य मंदिरे आहेत. येथील मठामंदिरांची संख्या फार मोठी आहे. यमुना नदीला या ठिकाणी बत्तीस घाट बांधलेले आहेत. घाटांनी आणि मठमंदिरांनी सुशोभित असलेले हे पवित्र कृष्णक्षेत्र हजारो यात्रेकरूंनी नित्य गजबजलेले असते. दर्शन, पूजाअर्चा, भजने आणि नृत्यगायन, स्नाने आणि प्रसादभक्षण वगैरे कार्यक्रम येथे अहर्निश चालू असतो.

वृंदावनाचा सारा परिसर उपवनांनी गच्च दाटलेला आहे. गवताची विशाल कुरणे या परिसरात मुद्दाम राखलेली आहेत. गाईगुरांच्या खिल्लारांनी हा सारा परिसर भरलेला आहे. या क्षेत्रात दूधदुभत्यांची भारी चंगळ आहे. येथील दूध, दही, खवा, लोणी आणि पेढे फार प्रसिद्ध आहेत. वृक्षवेलींनी फुललेला गोवर्धन पर्वत आणि कुरणाजंगलांनी व्यापलेला यमुना तट या गोष्टींमुळे वृंदावनाच्या सौंदर्यात विशेष भर पडलेली आहे.

श्रीकृष्णाच्या बाळपणातील अनेक लीलांची स्मृतिस्थळे वृंदावनक्षेत्रात ठायीठायी दिसून येतात. कुंजगली, मनगली वगैरे गल्ल्याबोळांची नावे, यमुनेतील कालियामर्दन डोह, गोपीवस्त्रहरणाचा यमुनेवरील चित्रहरण घाट, कुंजवनातील रासक्रीडांचे स्थान, दधिमंथनाचे रांजण, वगैरे अनेक प्रसंगांची आठवण या पवित्र स्थळी कायम ठेवलेली आहे. भाविक भक्तगण ही सारी स्मृतिस्थळे पाहून श्रीकृष्णलीलांचे स्मरण आदराने करतात.

वृंदावनक्षेत्रात गोविंददेवजी, राधावल्लभ, गोपीनाथ, जुगलकिशोर, मदनमोहन वगैरे अनेक भव्य मंदिरे आहेत.

या प्राचीन प्रख्यात मंदिराखेरीज रंगजीची मंदिरे, राधा-गोपाळ, इंद्रकिशोर, गोपीश्वर वगैरे सुंदर मंदिरेही प्रख्यात असून प्रेक्षणीय आहेत. अनेक राजेमहाराजांनी आणि



श्रीकृष्ण मंदिर, मथुरा.

भाविक धनिकांनी या सर्व मंदिरांना मोठमोठ्या देणग्या देऊन त्यांचे सौंदर्य वाढविले आहे.

गोविंद देवजीचे मंदिर तुकतुकीत अशा तांबड्या दगडांनी बांधलेले आहे. त्याची बांधणी अत्यंत मनोवेधक, लावण्यमय आणि चित्ताकर्षक आहे. तज्ज्ञ शिल्पकारही या मंदिराची हृदयंगम बांधणी पाहून थक्क होतात. रूप आणि सनातन या कल्पक गुरूंच्या मार्गदर्शनाखाली हे भव्य मंदिर इ. स. १५९० मध्ये बांधल्याचे सांगतात. औरंगजेबाची धाड या श्रीमंत मंदिरावर आली, तेव्हा पुजाऱ्यांनी या मंदिरातील श्रीगोविंददेवजीची सुंदर मूर्ती जयपूर येथे गुप्तपणे नेऊन ठेवली होती.

श्रीरंगजीचे मंदिर शेठ गोविंददास आणि राधाकृष्ण यांनी बांधले आहे. सुमारे पाच लक्ष रुपये खर्चून बांधलेले हे भव्य सुंदर मंदिर अत्यंत प्रशस्त आणि कलाकौशल्याने संपन्न असे आहे. या श्रेष्ठ मंदिराची बांधणी दाक्षिणात्य पद्धतीची असून त्याच्यासमोर भव्य गोपुरे व सुवर्णस्तंभ आहेत. या मंदिरात चैत्र आणि पौष महिन्यांत मोठे उत्सव होतात. त्या वेळचा साऱ्या वृंदावन क्षेत्राचा देखावा अगदी मनोहर दिसतो. त्या वेळी येथील वैभवाला अपूर्व शोभा येते.

वैष्णव पंथियांचे धार्मिक आणि आध्यात्मिक केंद्र म्हणून वृंदावन क्षेत्राची विशेष प्रसिद्धी आहे. येथे श्रीरामानुजांचा मठ आणि त्यांचे श्रीरंगजीचे मंदिर आहे, अकराव्या शतकात विशिष्टाद्वैत सिद्धान्ताचे प्रणेते श्रीरामानुज यांनी वैष्णव संप्रदायाचा प्रसार केला. त्यांनी देशभर अनेक मठ स्थापन केले आणि मंदिरे बांधली. निंबार्कवैष्णव या नावाचा एक पंथही येथे स्थापन झाला. केशव काश्मिरी आणि हरीव्यास मुनी यांनी हा पंथ वृंदावन येथे स्थापन

केला. या पंथाचेही अनेक मठ आणि मंदिरे येथे आहेत.



केशी घाट, वृंदावन.

वैष्णव सांप्रदायिकांनी वृंदावनक्षेत्रात श्रीकृष्ण रासलीला उत्सव सुरू केला. तो दरवर्षी अत्यंत थाटाने व भावपूर्ण रीतीने साजरा होत असतो.

व्रजयात्रा नावाचा उत्सवही अत्यंत पुण्यादायी समजतात. या वेळी हजारो यात्रेकरू केशी घाटाजवळ नावेत बसून यमुना नदीचे पात्र ओलांडून जातात आणि गोकुळ-मथुरा वगैरे ठिकाणी कृष्णदर्शने करून वृंदावनाला येतात. वृंदावन क्षेत्रात तसे रोजच अनेक उत्सव चालू असतात तथापि रासलीला, व्रजयात्रा वगैरे उत्सव फार प्रसिद्ध आहेत.

वृंदावनक्षेत्राजवळ यमुना नदीच्या पात्राने एकदम वळण घेतलेले आहे. त्या वळणासंबंधीची कथा अशी सांगतात : "श्रीकृष्णाने गोपींबरोबर रासलीला नृत्य केले, तसे आपणही करावे म्हणून कृष्णाचा बंधू बलराम याने प्रयत्न केला पण त्याचा तो प्रयत्न पाहून यमुनेला हसू आले. मग बलरामाला यमुनेचा राग आला त्याने आपल्या नांगराच्या यमुनेचे पात्र एकदम खेचून घेतले आणि त्यामुळेच यमुनेचे पात्र तेथे असे एकदम वळाले !

गोकुळ वृंदावनातील गौळणींची श्रीकृष्णाने अनेक वेळा थट्टा केली. खोडया करून त्याने गोपींची अनेक वेळा फजिती केली. पण त्याच्या त्या सर्व लीलांमुळे त्या सर्व गौळणी भक्तिमार्गाला लागल्या. श्रीकृष्णाला देव समजून त्यांनी त्याच्यावर अपार प्रेम केले.

त्या सर्व गौळणींत राधागौळण ही श्रीकृष्णाची अत्यंत आवडती होती. तिची निस्सीम भक्ती पाहून श्रीकृष्णाने तिचे नाव आपल्या नावाआधी घेण्यास लोकांना सांगितले. राधेकृष्ण, राधामाधव, राधावल्लभ, राधेश्याम वगैरे नावांत राधेसंबंधी आदरभाव साठविला आहे. वृंदावन क्षेत्रात

हाच जयघोष चालू असतो. वृंदावनविनोदिनी राधा ही श्रीकृष्णाची सर्वश्रेष्ठ भक्त होती. राधा ही श्रीकृष्णाशी अगदी एकरूप झाली होती. तिने आपल्या अपार भक्तीने चारही मुक्ती मिळविल्या होत्या.

यमुनातीरावरील कुंजवनात फिरत असता जयदेव कवीला राधाकृष्णाच्या रासक्रीडेचे स्मरण झाले आणि त्याच वेळी त्यांना गीत गोविंद हे प्रख्यात काव्य रचण्याची स्फूर्ती झाली.

श्रीकृष्णाची ती मोहमयी मुरली अद्यापही वृंदावनाच्या परिसरात भाविक भक्तांना ऐकू येते म्हणतात. ज्या मुरलीने सामवेद गायिला, गोपगोपींची शुद्धबुद्ध हरपून टाकली, चराचराला मोह पाडला, गाईवासरांना, मोर-हरिणांना तहानभूक विसरण्यास लावले, जिने नागांना डोलविले, वृक्षलतांना फुलविले आणि साऱ्या सजीवनिर्जीव सृष्टीला भुलविले ती प्रभावी जादूमयी मुरली अद्यापही चिरंजीवी राहिली नसेल तरच नवल. गोकुळ वृंदावनाचा परिसर त्या मुरलीरवाने भारावून गेलेला आहे त्या सुखाचा साक्षात्कार तेथे जाणारालाच होतो.

या मुरलीचे भाग्य काय वर्णन करावे! प्रत्यक्ष राधेलाही तिचा हेवा वाटे. एकदा मुरलीला एकटे गाठून राधेने तिला विचारले, "गडे मुरली, तू इतकी कृष्णाला प्रिय कशी? तुझे रहस्य तरी सांग. एक वेळ गोपालकृष्ण आम्हांला सोडून जाईल पण तू आपली सदा त्याच्या अधरावर विराजमान असतेस! कसली एवढी तपश्चर्या केलीस?" मुरली हसून म्हणाली, "राधिके, अगदी खरं

आहे. मी आता एकटी राहीन म्हटले तरी ते आता शक्य नाही. यांचे इंगित सांगू तुला? अग, मी आतून बाहेरून पोकळ झाले. माझे स्वतःचे अस्तित्त्व मी केव्हाच विसरून गेले त्यामुळे प्रभूची फुंकर माझ्या नसानसांतून विहरू लागली की माझे सर्वांग पुलकित होते. नादलहरींच्या अमृतधारा निघू लागतात; मग तूच काय हे सर्व बाल-गोपाल, गोपी, गाई, वासरे हरणे, मयूर, कोकीळ, भारद्वाज, इतकेच काय पण हिंस्र पशूदेखील तहान-भूक, वैमनस्य विसरून कृष्णाच्या भोवती फेर धरू लागतात. देव, यक्ष आणि किन्नरही या मधुर संगीताचा हेवा करतात! मुरली कृष्णमय झाली ! निराळी राहिलीच कोठे ?"

मुरलीचे हे सर्वस्व समर्पण वृत्त ऐकून राधिका शहारून गेली. आणि " कृष्ण कृष्ण जय, कृष्ण कृष्ण जय, " या जयघोषात नाचू लागली !

वृंदावन क्षेत्रातील स्नानदान, पूजाअर्चा, नृत्यगायनादि कार्यक्रम, दूधदुभत्याचे स्वस्त मिळणारे भरपूर पदार्थ व प्रसाद, हजारो मठमंदिरांची दर्शने, लाखो आरशांचा कलापूर्ण सजावटीच्या सुंदर भिंती असलेली कौशल्यपूर्ण दालने पाहणे वगैरेंसाठी कोणाही माणसाला एक दिवस पुरत नाही.

वृंदावन क्षेत्रात अशा यात्रेकरूंना, प्रवाशांना, कलाप्रेमी लोकांना उतरण्या–राहण्याच्या सोयी फारच चांगल्या आहेत. यमुनेच्या पात्रातील कालियाडोह वगैरे स्थळांचे दर्शन घेऊन, कदंबवृक्षाला आलिंगन देऊन भाविक लोक पैलतीरावरील गोकुळ क्षेत्रालाही भेट देतात. सध्याच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

काळात हे गोकुळ क्षेत्र अत्यंत जीर्णावस्था प्राप्त झालेले आहे; पण अजूनही तेथे श्रीकृष्णाच्या बाललीलांची साक्ष पटते. नंदाचा जुना वाडा दिसतो. त्यात श्रीकृष्णाच्या लहानपणातील कृतींची चित्रे, मूर्ती, प्रसंग जसेच्या तसे तयार करून ठेविले आहेत, वाड्याकडे जाताना पेंद्या वगैरे गोपांची बालके रस्त्यावर श्रीकृष्णाचे बोबडे बोल गुणगुणत यात्रिकांकडून खाऊ मागतात–द्या" दूध, दही, लोणी असे म्हणतात. आईने मारल्याचे सोंग करतात आणि, 'मैया, मै नही माखन खायो' असे गाऱ्हाणे सांगून पैसे मागतात.

जवळच एक सुरम्य बांधवलेला घाट आहे. घाटाच्या पायऱ्यावरून यमुनेचा प्रवाह खळखळत वाहत असतो. वृक्षाची गर्द छाया आहे. वातावरण प्रसन्न, शांत व पवित्र आहे. श्रीकृष्णाच्या बाललीला ज्या परिसरांत झाल्या त्याला हजारो वर्षे उलटून गेली; त्या कथन करण्यास कोणी उरले नाही. पण असे म्हणू नका. जरा यमुना लहरींच्याकडे लक्ष द्या. यमुनेच्या या लहरी कृष्णलीलांच्या मधुर कथातच रंगून गेलेल्या नाहीत का ? पाहा खळखळून हसत खिदळत, कशा एकमेकींची थट्टा करत, त्या कृष्णलीलांचे वर्णन करीत आहेत, ऐका !

यमुनाकाठचे सृष्टिसौंदर्य आणि तेथील सर्व वनउपवनातील मोर–माकडांच्या विविध जाती पाहून प्रत्येकाला आश्चर्य वाटते. गोकुळवृंदावन क्षेत्राचे ते एक वैशिष्ठ्यच आहे. सर्व प्राणी तेथे अगदी निर्भय आहेत.

गोकुळवृंदावनाच्या व्रजभूमीचा पसारा अनेक कोसांचा


आहे. नंदगावातील नंद–यशोदा कृष्ण बलरामांच्या सुंदर रेखीव काष्ठमूर्ती व त्या टेकडीचा रम्य परिसर, बरसाना येथील राधेचे जन्मस्थान, आणि यमुनाकाठचे धीरसमीर नावाचे क्रीडास्थान ही स्थळे पाहण्यासाठी यात्रेकरूंना कितीतरी मैल चालावे लागते. नुसत्या गोवर्धन पर्वताची प्रदक्षिणाच सुमारे बत्तीस किलोमीटर अंतराची आहे.

सुरजमल जाटाची छत्री आणि गोकुळातील ब्रह्मांडघाट व बलदेव क्षेत्र ही स्थानेही प्रेक्षणीय आहेत. कृष्णाने माती खाल्ली म्हणून यशोदेने त्याला 'आ' करण्यास सांगितले. त्याने तोंड उघडले तो तिला कृष्णाच्या तोंडात सारे विश्व समावलेले दिसले. तो चमत्कार या ब्रह्मांड-घाटाजवळ झाला असे सांगतात.

या वृंदावनक्षेत्राची परिक्रमा करणारांना अनेक वने-उपवने हिंडावी लागतात. त्याचा नकाशाही येथे मिळतो. पंडे लोक या यात्रेची संपूर्ण माहिती देत असतात. चालता चालता ते लोक तोंडाने "राधारमण जय गोविंद हरे ! राधारमण जय गोपाळ हरे!" अशा प्रकारचे भक्तीगीत, अनेक श्लोक व पदे म्हणत असतात. श्रीकृष्ण राधेची ती गाणी ऐकताना यात्रेकरूंना विशेष आनंद मिळतो.

मथुरा आणि वृंदावन या दोन क्षेत्रांच्या मधील मार्गावर श्रीमान बिर्लाजींनी एक अत्यंत सुंदर असे गीता-मंदिर बांधलेले आहे. शुभ्र संगमरवरी स्फटिकशीलांनी ते मंदिर अगदी आधुनिक काळात बांधलेले असून त्या मंदिरामुळे श्रीकृष्णाच्या त्या पवित्र व्रजभूमीला विशेष शोभा आली आहे.

सुशोभित प्रांगणाच्या अत्यंत रमणीय फुलझाडांच्या हिरवळीजवळ शुभ्र संगमरवरी स्फटिकाचा श्रीकृष्णाचा रथ आणि त्याचे ते भव्य तेजःपुंज घोडे पाहून आपण हर्षित होतो. समोरच एक मोठे प्रचंड सभागृह बांधलेले आहे.



मथुरेतील श्रीकृष्ण जन्मस्थानी चौथ्यांना बांधण्यात येत असलेल्या नवीन मंदिराच्या मागचा भाग असून मंदिराच्या समोर इदगा दिसत आहे.

त्याच्या भव्य दालनातील सर्व भिंतींवर स्फटिकशिलांवर श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या ही अध्यायांतील श्लोक कोरलेले आहेत. गोकुळवृंदावनांची यात्रा करणारे लोक त्या गीतामंदिराला मुद्दाम भेट देऊन तेथील पावित्र्य,

शांतता व भव्योदात्तता पाहून आदराने विनम्र होतात.

मथुरेहून वृंदावनास जाताना वाटेत एके ठिकाणी श्रीकृष्णाचे जन्मभूमी स्थान आहे; मुसलमानांच्या आक्रमक हल्ल्याने मूळ जन्मस्थानचे ठिकाण, मंदिर व परिसर उद्‌ध्वस्त केले गेले असून त्या ठिकाणी मशीद बांधलेली आहे. सुदैवाने श्रीकृष्ण जन्मभूमीची जागा निश्चित झाली असून तेथे जीर्णोद्धार करून हे एक भव्य कृष्ण मंदिर बांधण्याची योजना श्रीकृष्ण जन्मभूमी ट्रस्ट स्मारक कमिटीकडून झालेली आहे.

ज्या कैदखान्यात भगवानाने प्रकट होऊन वसुदेव देवकीला आपणांस एका अज्ञात स्थळी नंदाकडे नेऊन ठेवण्यास सांगितले ती जागा आज कटराकेशवदेव या नावाने ओळखली जाते. प्रसिद्ध संशोधक मि. कॅनिंग हॅम, मथुरा म्युझियमचे संस्थापक श्री. ग्राऊस आय्. सी. एस्. यांच्यासारख्या पुराणवस्तू संशोधकांनी परिश्रमपूर्वक संशोधन करून ही जन्मभूमीची जागा निश्चित केली आहे. याच ठिकाणी श्रीकृष्णाचे भव्य स्मारक मंदिर उभारले जाणार आहे. कामाला सुरुवात झाली आहे. सोरटी सोमनाथाच्या जीर्णोद्धाराप्रमाणेच हे भव्य स्मारक मथुरेस साकार झालेले दृष्टीस पडेल; तो दिवस आपणा सर्व भारतीयांना अतिशय आनंददायक वाटेल कारण श्रीकृष्ण हे आपणा सर्वांचे आवडते दैवत आहे. सर्व विश्वाला गीतोपदेश करून जीवनातील महान संदेश देणारा श्रीकृष्ण ‘मथुरेत इथे जन्मला’ हे सांगताना प्रत्येकाचे अंतःकरण आनंदाने आणि अभिमानाने उचंबळून येईल.

# ७ : सिद्धपूर ( मातृगया )

उत्तर गुजरात प्रांतात, मेहेसाणा जिल्ह्यात सरस्वती नदीच्या तीरावर वसलेले सिद्धपूर हे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. पाटणपासून सतरा मैलांवर आणि अहमदाबादपासून चौसष्ट मैलांवर सिद्धपूर हे गाव वसलेले आहे. ते अहमदाबाद दिल्ली या पश्चिम रेल्वे फाट्यावर पालनपूर या ठिकाणाहून अगदी नजीक आहे. अबू पर्वतावर कोटेश्वर महादेव मंदिरानजीक उगम पावून सरस्वती नदी नैर्ऋत्येस वाहत वाहत सिद्धपुरावरून कच्छच्या रणात प्रवेश करते व तेथेच लुप्त होते. तिचे सागराशी मीलन होत नाही त्यामुळे तिला कुमारी सरस्वती नदी असे समजतात.

सिद्धपूरची हल्लीची लोकवस्ती औदीच्य ब्राह्मण आणि बोहरी लोकांची आहे. दहाव्या शतकात येथील ब्राह्मणांचे पूर्वज यज्ञयागासाठी उत्तरेतून येथे आले, म्हणून यांना औदीच्य ब्राह्मण नाव पडले. सुप्रसिद्ध गया हे क्षेत्र जसे पितरांना श्राद्ध संतर्पण करण्याचे पवित्र ठिकाण समजले जाते, तसे सिद्धपूर हे क्षेत्र मातृगया म्हणून प्रसिद्ध आहे. सरस्वती नदीच्या तीरावर बिंदुसरोवराजवळ हा श्राद्धविधी

यथासांग केला जातो. म्हणून या ठिकाणाला ‘ मातृगया ’ अशी संज्ञा आहे.

सिद्धपूरचे मूळ नाव श्रीस्थल. यासंबंधी दंतकथा अशी आहे: भगवान विष्णू हे श्री म्हणजे लक्ष्मी हिच्यासमवेत या ठिकाणी वास्तव्य करीत होते, त्या प्रसंगी विश्वकर्म्याने तेथील जंगल तोडून त्या ठिकाणी एक सुंदर वैभवशाली शहर वसविले; त्याला श्रीस्थल असे नाव मिळाले. समुद्र-मंथनाच्या वेळी जी चौदा रत्ने बाहेर आली, त्यातूनच लक्ष्मी सागरातून प्रगट झाली; विष्णूने तिचा पत्नी म्हणून स्वीकार केला आणि ती दोघे फार पुरातन काळापासून या ठिकाणी वास्तव्य करून होती.

श्रीस्थल येथे सरस्वती नदीच्या पात्रात माधवाची सुंदर मूर्ती सापडली. ते स्थान प्राची माधव म्हणून प्रसिद्ध झाले.

सरस्वती नदीचे जल पवित्र म्हणून पुराणकालापासून प्रसिद्ध आहे. असे सांगतात की, महाभारतकालीन युद्धात भीमाने दुःशासनाला कंठस्नान घातले, त्याचे रक्त तो घटाघटा प्याला; त्याने आपली घोर प्रतिज्ञा पुरी केली. त्याची तहान भागेना, घसा कोरडा पडू लागला, तेव्हा त्याला प्रायश्चित्त घेण्यास सांगण्यात आले. ते असे: सरस्वती नदीत अवगाहन करून शुचिर्भूत होऊन तिचे तीर्थ प्राशन केल्याने हा दाह शमेल. त्याप्रमाणे भीमाने स्नान करून सरस्वती नदीचे हे तीर्थ प्राशन केले आणि मानवी रक्त पिण्याच्या पापातून तो मुक्त झाला.

सांख्यदर्शन या महान तत्त्वज्ञानाचे निर्माते कपिल महामुनी यांचे सिद्धपूर हे जन्मस्थान. भगवान कपिल

महामुनींची पौराणिक कथा भागवताच्या तिसऱ्या स्कंधात सविस्तरपणे वर्णिली आहे. स्वायंभुव मनूला देवहूती नावाची एक कन्या होती. ती अतिशय सुंदर आणि सद्गुणी होती. तिच्या मातापित्यांना तिला अनुरूप वर प्राप्त करून देण्यासंबंधी काळजी उत्पन्न झाली. असा अनुरूप तरुण वर कसा अणि कोठे मिळणार ?

ब्रह्मदेवाने आपला पुत्र कर्दम याला संसार करण्याची आज्ञा केली. आपल्याला सद्गुणसंपन्न पत्नी मिळावी म्हणून कर्दमाने सरस्वती नदीच्या तीरावर तपश्चर्या करण्यास सुरवात केली. त्याने पवित्र श्रीस्थल हेच ठिकाण आपल्या तप:साधनेस पसंत केले. त्याच्या तप:सामर्थ्याने भगवान विष्णूला इतका आनंद झाला की त्या आनंदातिरेकाने त्याच्या नयनांतून जे अश्रुबिंदू ओघळले त्यांचे बिंदुसरोवरात रूपान्तर झाले. भगवान विष्णूच्या सूचनेप्रमाणे कर्दमाने देवहूतीशी लग्न केले. देवहूतीच्या पोटी मी अवतार घेईन, असे वचन भगवान विष्णूने कर्दमाला दिले होते, त्याप्रमाणे यथाकाल देवहूती प्रसूत झाली; भगवान विष्णू कपिल महामुनींच्या स्वरूपात अवतरले. विवाह होण्यापूर्वी कर्दमाने देवहूतीला सांगून ठेवले होते की, मला पुत्र झाला की मी संन्यास घेणार ! आपल्याला जो पुत्र होईल तो मात्र महान तत्त्वज्ञ म्हणून प्रसिद्धीस येईल; देवहूतीला पहिल्या एकंदर नऊ मुली झाल्या. दहाव्या खेपेस पुत्ररत्न झाले, तेच भगवान कपिल महामुनी म्हणून प्रसिद्धीस आले. कपिल महामुनींनी तत्त्वज्ञान सांगून आपल्या मातेचे सांत्वन केले.

सिद्धपूर या स्थानाला मातृगया हे नाव प्राप्त झाले. त्यासंबंधी पुढील पौराणिक कथा प्रसिद्ध आहे: आपला पिता जमदग्नी, त्याच्या आज्ञेनुसार परशुरामाने आपली माता रेणुका हिचा वध केला. या मातृहत्येबद्दल प्रायश्चित्त घेण्यासाठी भगवान परशुराम बिंदुसरोवरास आले. तेथे स्नान आणि श्राद्धविधी करून प्रायश्चित्त घेऊन मातृहत्येच्या पापातून ते मुक्त झाले. त्यामुळे मातेला सद्‌गती मिळाली! त्या काळापासून हे क्षेत्र मातृगया म्हणून प्रसिद्धीस आले.

दधीची ऋषींचा आश्रमही या ठिकाणी होता, असे सांगतात. राक्षसांच्या बरोबर युद्ध करून त्यांना जिकल्या-वर देवादिकांनी आपली सर्व शस्त्रास्त्रे दधीची ऋषींच्या आश्रमात नेऊन ठेवली. दधीची ऋषींना तप:साधनेसाठी हिमालय पर्वतावर जायचे होते. या सर्व शस्त्रास्त्रांची शक्ती दधीची ऋषींनी आपल्या शरीरात सामावली आणि ते हिमालय पर्वतावर निघून गेले. मग देवांना या शस्त्रास्त्रांची गरज भासू लागली. आश्रमातील शस्त्रास्त्रे पाहतात तो त्यांची सर्व शक्ती हिरावून नेलेली. देव असंतुष्ट झाले. त्यांनी दधीची ऋषींजवळ त्यांच्या हाडांची मागणी केली. या हाडांची नवी शस्त्रे बनविल्याशिवाय गत्यंतर नव्हते. देवांची मागणी दधीची ऋषींनी मान्य करून आपला देह विसर्जन केला आणि आपली हाडे दिली. वृत्रासुराला मारण्यासाठी इंद्राने या हाडांच्या शस्त्रांचा उपयोग करून विजय मिळविला, अशी कथा आहे.


सिद्धपूरला यात्रेसाठी येणारे भाविक यात्रेकरू सरस्वती नदीचे स्नान करतात. कपिलाश्रम, ज्ञानवापी, अल्पसरोवर,

बिंदुसरोवर या पवित्र स्थळांचे दर्शन घेतात. सरस्वती नदीच्या तीरावर अगर बिंदुसरोवरासमीप मातेच्या श्राद्धाचा विधी यथासांग करतात. कपिल महामुनींनी आपल्या आईला या ठिकाणी आत्मज्ञानाचा उपदेश केल्यामुळे तिचा उद्धार झाला. त्यामुळे येथे श्राद्ध करून पिंडदान केले असता सर्व मातृकुलाचा उद्धार होतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे

येथे फक्त आईचे स्वतंत्र श्राद्ध होते. श्राद्ध करताना आईची त्रयी सासरची घेतात. माहेरची घेत नाहीत. ही सर्व श्राद्धे बिंदुमाधव तीर्थावर चटावर करतात. बिंदुमाधव सरोवर हे एक लहान तळे आहे. पाणी जिवंत आहे, पण वाहते नाही.

मूळराज सोळंकी नावाच्या एका महत्त्वाकांक्षी शैव-पंथीय वीराने आपल्या मामाला आणि त्यांच्या कुटुंबियांना ठार मारून राज्य मिळविले. उतार वयात त्याला आपल्या या कृत्याचा पश्चात्ताप झाला. तो सर्वत्र हिंडू लागला व श्रीस्थल येथे राहू लागला. तेथील औदीच्य ब्राह्मणवृंदांना त्याने मुक्त हस्ताने दानधर्म केला. त्याने इ. स. ९४४ साली रुद्रमहालय मंदिर बांधण्यास सुरवात केली. ते काम ९९६ सालापर्यंत चालू होते. मूळराजाचा अंत झाल्याने मंदिराचे काम तसेच राहिले. मूळराज सोळंकी याने शिवलिंग आणून त्याची स्थापना केली, असा संवत १०४३ सालचा ताम्रपट सापडला आहे. त्यानंतर पावणे दोनशे वर्षांनी गुजरात प्रांताचा महाप्रतापी राजा सिद्धराज जयसिंह याने रुद्रमहालयमंदिराचा जीर्णोद्धार केला. पण

त्याच्याही हातून मंदिराचे काम पूर्ण झाले नाही. कर्नल टॉड याने येथील दोन शिलालेख वाचले आहेत. एक मूळराजाने हा रुद्रमाळ बांधण्यास सुरवात केली त्या वेळचा आणि दुसरा संवत १२२० माघ कृष्ण चतुर्दशी सोमवार या दिवशीचा म्हणजे ज्यावेळी सिद्धराज जयसिंहाने हे मंदिर त्याच्या कल्पनेप्रमाणे पूर्ण केले त्या दिवशीचा. सिद्धराज जयसिंहाने या मंदिराच्या पूर्तीसाठी चौदा कोटी सुवर्ण मुद्रा खर्च केल्या. इ. स. १२९७-९८ साली उलुखखान याने हे मंदिर उद्ध्वस्त केले. या मंदिराची पुनः उभारणी केली गेली. पण तेही मंदिर अहमदशाहाने इ. स. १४१५ मध्ये स्वारी करून उद्ध्वस्त केले. सध्या रुद्रमहालय मंदिराचे फार थोडे अवशेष शिल्लक आहेत. मंदिराच्या उत्तरेच्या



रुद्रमहालय मंदिराचे अवशेष

कमानीचे चार स्तंभ, पूर्वेच्या कमानीचे पांच स्तंभ, मंडपाच्या पाठीमागचे चार स्तंभ, तेथील तोरण आणि एक खोली आता पडक्या स्थितीत दिसतात. पण त्यावरूनही मंदिराच्या मूळच्या स्वरूपाची कल्पना येते.

मूळचे मंदिर जर आज दृष्टीस पडते तर त्याचे वर्णन शब्दांकित करणे अशक्य झाले असते, इतके ते प्रचंड आणि भव्य होते. म्हणून रुद्रमहालयाला उपमा देत असत ती कैलासाची. असंख्य दीपमाळा बांधलेल्या असून त्यांवर देदीप्यमान दीप पाजळले जात असत. रुद्रमहादेवाची एकंदर अकरा मंदिरे होती. कारण एकंदर रुद्र अकरा; प्रत्येकाचे एक मंदिर. पुढे कालान्तराने या श्रीस्थलाला सिद्धपूर हे नामाभिधान प्राप्त झाले, ते सिद्धराज जयसिंह याने येथील मंदिराचा जीर्णोद्धार केला म्हणून. मंदिराच्या असंख्य दगडी स्तंभावर जे शिल्पकलेचे कलाकुसरीचे उत्कृष्ट नमुने दिसून येतात, त्यांवरून त्या काळी शिल्पकला किती श्रेष्ठ दर्जाची होती ते समजून मन आश्चर्यचकित होते. विशेष म्हणजे दगड तर या भागात मुळीच नाही, मग एवढ्या प्रचंड इमारतीला दगड कोठून आणले असतील? या भागासारख्या वालुकामय प्रदेशामध्ये इतकी उंच इमारत बांधण्यास पाया किती खोल खणला असेल? सगळेच अद्‌भुत वाटते ते पूर्ण स्वरूपात आता आढळत नाही, म्हणून दुःखही होते. सिद्धपूर क्षेत्राच्यापरिसरात हिंगलजामाता, नीलकंठेश्वर, भूतनाथ, ब्रह्मांडेश्वर आणि सतीमंदिर अशी प्रसिद्ध मंदिरे आहेत; पण सिद्धपूर प्रसिद्ध आहे ते मातृगया म्हणून!

# संदर्भसाहित्य


- ज्ञानकोश : *संपादक. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर*
- माझी तीर्थयात्रा भाग १, २ : *श्री. गोविंद हरी फडके*
- दक्षिण हिंदुस्थानचा प्रवास : *श्री. गोविंद हरी फडके*
- भारतीय संस्कृति कोश १, २ व ३ : *संपादक : पं. महादेवशास्त्री जोशी*
- गुजरात (सांस्कृतिक परिचय) : *पं. महादेवशास्त्री जोशी*
- तामिळनाडु (सांस्कृतिक परिचय) : *पं. महादेवशास्त्री जोशी*
- कल्याण मासिक : *तीर्थ विशेषांक*
- माझा देश, माझे लोक : *श्री. श्रीपाद जोशी*
- भगवान कोणादित्य : *श्री. आनंदयात्री*
- माझा प्रवास : *श्री. गोडसे भटजी*
- भारतदर्शन : *श्री. काका कालेलकर*
- जीवनलीला : *श्री. काका कालेलकर*
- श्रीदत्तसंप्रदाय : *श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे*
- श्रीनाथसंप्रदाय : *श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे*
- अयोध्यामाहात्म्य : *पं. नत्थूभट्टजी मढीकर*
- हिंदुस्थानचे नंदनवन : *श्री. गो. चिं. भाटे*
- चारीधामयात्रेची माहिती : *श्री. नारायण नानाजी पेटकर*
- बारा गावचं पाणी : *प्रा. वसंत बापट*
- Temples And Legends of Andhra Pradesh : *Shree N. Ramesan*
- Immortal India Parts 1 to IV : *Shree G. H. Dave*
- Bhavan's Journal *चे अनेक अंक*
- Department of Tourrism *ने प्रकाशित केलेल्या अनेक पुस्तिका*
- Die Kunst Indiens : *Von Ervin Baktay*
- विविध क्षेत्र वर्णनपर पुस्तिका :

REFBK 0015833

REFBK-0015833